मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

# निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.**

**सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.**

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

# युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
ग्रंथ संपदा

या अंकात

* प्रा. गो. मा. कुलकर्णी
* प्रा. भा. श्री. परांजपे
* दे. गो. लांडगे

ऑगस्ट १९६४

★

मूल्य ५० न. पैसे

शिवाय, संपादकीय
परिचय परामर्श, संघवार्ता इ०

संपादकः– प्रा. श्री. मा. कुलकर्णी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने—

# प्रयोगक्षम मराठी नाटके

(एक सूचिग्रंथ)

ले.—डॉ. मु. श्री. कानडे, पुणे

किंमत रु. १५–००

आरंभापासून आजपर्यंत जी नाटके रंगभूमीवर आली त्याच्यासंबंधी, थोडक्यात माहिती देणारा हा मराठीतील पहिलाच सूचिग्रंथ होय.

# "मराठी वर्णोच्चार–विकास"

लेखक—प्राचार्य डॉ. द. ह. अग्निहोत्री

(मराठीच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त संशोधनग्रंथ)

जाड टिकाऊ बांधणी

पृष्ठे–४१८ मूल्य रु. १६–००

पुरुषार्थ मासिकाचा

# सत्पुरुषांक

अनंत कोटि ब्रह्मांड–नायक परमेश्वराचे अनंत ऐश्वर्य व सामर्थ्य संत–जीवनांत कां, कसे व केव्हां प्रगट होते, याची सामान्य कल्पना होण्याचें एकमेव साधन म्हणजेच पुरुषार्थ मासिकाचा सत्पुरुष विशेषांक होय. एकूण भाग ३. पहिला भाग जुलै महिन्याचे आरंभी प्रसिद्ध होईल. वार्षिक ६ रु. वर्गणीतच हे तिन्ही भाग ग्राहकांस मिळावयाचे आहेत.

स्वाध्यायमंडळ, पारडी (जि. बलसाड)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

:: संपादक मंडळ ::
भा. श्री. परांजपे
ब. कृ. बऱ्हाणपांडे

# युगवाणी

संपादक:—श्री. मा. कुळकर्णी

वर्ष १९ ] ऑगस्ट १९६४ [ अंक ४

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय ... | २ |
| २. | परत मातृभूमिला ... ... | ५ |
| ३. | नामदेवाच्या गाथ्यातील एक प्रक्षिप्त प्रकरण ... | १६ |
| ४. | एक विद्यमान भक्त कवि दास नरहरि ... | २१ |
| ५. | परिचय परामर्श ... | ३१ |
| ६. | संघ वार्ता ... | ३७ |

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# संपादकीय

## लोकमान्यांचे पुण्यस्मरण

ऑगस्ट महिन्याचा प्रारंभ लोकमान्यांच्या पुण्यस्मरणाने होतो. थोर पुरूषांचे पुण्यस्मरण हे त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, त्यांची स्मृति ताजी ठेवून त्यांच्या चरित्रापासून बोध व स्फूर्ति घेण्यासाठी करावयाचे असते. श्रीशिवाजी महाराजांच्या जयंतीउत्सवा संबंधी लिहिताना स्वत: लोकमान्य टिळकांनीच केसरीच्या दि. २६ मे १८९६ च्या अंकात लिहिले आहे, 'शिव-जयंतीसारखे थोर पुरूषांचे उत्सव करून त्यांच्या कृतीचें व उद्योगाचें आपल्या देशबांधवांत स्मरण जागृत ठेवणे हें आमच्या प्रयत्नाधीन असून कृतज्ञता बुद्धीने म्हणा, अगर देशहिताच्या दृष्टीने म्हणा, हे आपले पहिले कर्तव्य आहे."

—लो. टिळकांचे केसरीतील लेख भाग १ ला, १९२२. पृ. ५४७

देशात ठिकठिकाणी लो. टिळकाची पुण्यतिथी साजरी करण्यात आली हे या कर्तव्याच्या दृष्टीने योग्यच झाले. अशा उत्सवांपासून काय अपेक्षित आहे तेहि लोकमान्यांच्याच शब्दात चांगल्या रीतीने सांगता येईल. वरील वाक्याच्या नंतर लगेच लोकमान्यांनी लिहिले आहे, "शिवराजाच्या चरित्राचीं पारायणें केल्याने अथवा शिवजयंतीचे पुष्कळ उत्सव केल्याने कोणी मावळा अगर बी.ए. सुधारक अथवा धर्माभिमानी शिवाजी अथवा रामदास होऊं शकतो असे नाही; पण ज्याप्रमाणे अलेक्झांडरचें चरित्र जुलियस सीझरास प्रोत्साहान मिळण्यास कारण झाले त्याप्रमाणे श्रीशिवाजी महाराजांसारख्या थोर पुरूषांच्या उत्सवापासून व चरित्रापासून कालांतरानें ज्या पुरूषांच्या अंगी नैसर्गिक बुद्धि किंवा ओज असेल त्यांस उमेद येण्याचा संभव आहे. थोर पुरूषांची चरित्रे, पुतळे, जयंत्या ज्या करावयाच्या त्या येवढ्याचकरितां होत;. . . "

लोकमान्यांच्या अष्टपैलु व्यक्तित्वापासून व त्यांच्या उज्ज्वल चरित्रापासून व चारित्र्यापासून भारतीयांना, विशेषत: ज्यांच्या अंगी 'बुद्धि व ओज' असून जे राष्ट्राचे नेतृत्व करू इच्छितात त्यांना स्फूर्ति मिळो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून आम्ही लोकमान्यांच्या पुण्यस्मृतीला आदरांजलि अर्पण करतो.

## प्रा. ना. सी. फडके

महाराष्ट्रातील एक थोर कलावंत साहित्यिक प्रा. ना. सी. तथा आप्पासाहेब फडके यांच्या वयाला ४ ऑगस्ट १९६४ रोजी ७० वर्षे पूर्ण होऊन ७१ वे वर्ष लागले ही आनंदाची गोष्ट आहे.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यावर नितांत निष्ठा असणारा. साहित्यिक म्हणवून घेण्यात गौरव मानणारा, साहित्याची पन्नास वर्षे अखंडपणे सेवा करणारा आणि शंभराहून अधिक विविध कलाकृतींची मराठी साहित्यात मोलाची भर घालणारा प्रतिभाशाली साहित्यिक महाराष्ट्रात तरी श्री. आप्पासाहेबांखेरीज दुसरा कोणी सापडणे कठिण आहे.

निबंध, प्रबंध, टीका, चरित्र, ललित निबंध, नाटक, कथा, कादंबरी अशा अनेक वाङ्मय प्रकारातून प्रा. फडक्यांच्या लेखणीने संचार केला आहे व त्या सर्व वाङ्मयप्रकारात मोलाची भर घातली आहे, पण रसिक वाचकवर्ग त्यांना ओळखतो ते मुख्यत: कादंबरीकार म्हणून: त्यांचे प्रबंध, त्यांनी लिहिलेली चरित्रं किंवा त्यांचं कथावाङ्मय हे श्रेष्ठ नाही असं कोण म्हणेल? पण फडके या आडनांवाशी कादंबरीकार हे विशेषण कायमचं निगडित झालं आहे हे खरं. आणि ते रास्तहि आहे. कादंबरी या वाङ्मयप्रकाराची प्रा. फडके यांनी विशेष उल्लेखनीय व संस्मरणीय अशी सेवा केली आहे.

हरिभाऊ आपटे हे कलावंत होते. त्यांच्या नंतर कलावंत कादंबरीकार म्हणजे प्रा. फडकेच होत यात शंका नाही. आपटयांची कलाविषयक भूमिका निराळी होती, फडक्यांची निराळी आहे. त्यामुळे दोघांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप निराळे झाले आहे. परंतु कथानक फुलवीत नेण्याचे सामर्थ्य व कौशल्य, जिवंत व्यक्तिचित्रणाचे कसब, संवादरचनेतील सहजता व स्वाभाविकता हे गुण आपटयांच्या प्रमाणेच फडक्यांच्याहि कादंबऱ्यात प्रकर्षाने प्रगट झाले आहेत. इतकेच नव्हे तर सुटसुटीतपणा, रेखीवपणा, लालित्य इ. गुण आपटयांच्या पेक्षा फडक्यांच्या कादंबऱ्यात अधिक आहेत. म्हणून १९२० नंतरच्या काळात कादंबरीलेखन कलेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा पहिला मान प्रा. फडक्यांचा आहे. नंतरच्या कादंबरीलेखनावर फडक्यांच्या कलेचा अमीट ठसा उमटलेला आहे.

प्रा. फडके यानी तत्रविषयक अनेक प्रयोग जाणीव पूर्वक केले व कादंबरीच्या तत्रातील विविध मंत्र सप्रयोग सिद्ध केले. कादंबरीच्या अगप्रत्यंगावर त्यांनी नवा साज चढविला. कथानकाचा प्रारंभ कसा करावा; अखेरी कशी साधावी, अनुकूल–प्रतिकूल प्रसंगांची गुंफण कशी करावी; वाचकाच्या मनाची चटकन् पकड घेऊन ती जिज्ञासा, विस्मय, उत्कंठा अशा स्वरूपात सतत कायम कशी ठेवावी, त्यासाठी रहस्यांचा उपयोग कसा करावा हे त्यांनी अनुभवपूर्वक ठरविलं, जाणीवपूर्वक वापरलं व इतरांना धडा घालून दिला. चालत्या–बोलत्या, जिवंत, वाटतील अशा व्यक्ति निर्माण करण्याचं फडक्यांच कसब असामान्य आहे. जिवंत, स्वाभाविक व चटकदार संवाद लिहावेत तर फडक्यांनीच.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठी कांदबरीतील भाषाशैलीला व एकंदरीनेच मराठी भाषेच्या सौंदर्याला प्रा. फडक्यांनी फार मोठी देणगी दिली आहे. नटवी नव्हे पण कलापूर्ण, संस्कारित पण तरीहि साधी, अलंकारजड नव्हे पण कल्पक, कोटीबाज नव्हे पण चतुर, यमकानुप्रासयुक्त नव्हे पण लयबद्ध व नादमधुर अशी शैली ही त्यांची मराठी कादंबरीला फार मोठी देणगी आहे. 'सुंदर कसे बोलावे व सुंदर कसे लिहावे' हे प्रा. फडक्यांनी शिकविलं आहे असं म्हंटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

श्री. फडके हे कलावंत आहेत तसेच रसिक आहेत. जीवनाचा, त्यातील सौंदर्याचा, रसिकतेने आस्वाद घ्यावा व शब्दमाध्यमातून तो इतरांना द्यावा हा उद्योग, हा व्यापार ते सतत करीत आले आहेत. आज सत्तरी ओलांडतानाहि त्यांची प्रतिभा अम्लान व रसिकता ताजी आहे. त्यांच्या प्रतिभेचे नवे नवे आविष्कार दीर्घकाळ पर्यंत रसिकांना आल्हाद देत राहोत व त्यासाठी त्यांना दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो असे आम्ही मनः पूर्वक इच्छितो !

—श्री. मा. कुलकर्णी

## लेखक व प्रकाशक यांना विनंति

'युगवाणी'कडे अभिप्रायार्थ पुस्तके पाठविताना पुस्तके वि. सा. संघ कार्यालयाच्या पत्यावर रवाना करताच तशी सूचना, पुस्तकांच्या नांवासह, संपादकांना त्यांच्या घरच्या पत्त्यावर वेगळे कार्ड पाठवून देण्याची कृपा करावी. त्यामुळे त्या पुस्तकांची दखल लवकर घेणे सुलभ जाईल.

पत्ता :
प्रा. श्री. मा. कुलकर्णी
'राजमाणिक'
हनुमान नगर, नागपूर ३.

—संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# परत मातृभूमीला

लेखक–प्रा. गो. मा. कुलकर्णी

१३ जुलै १९६१ रोजी बोटीनं मुंबईचा किनारा सोडला त्याच वेळेपासून मुंबईच्या बंदरात केव्हां उतरेन असं झालं होतं. ११ ऑगस्ट रोजी न्यूयॉर्कच्या बंदरात उतरल्यावर तिथे आपल्या स्वकीयांना उतरवून घेण्यासाठी जमलेली मंडळी पाहून तर ही भावना अधिकच बळावली. आपण परत गेलों आहोत व मुंबई बंदरात आपल्याला उतरवून घेण्यासाठी आपली माणसं आली आहेत असा क्षणभर भास झाला व शरीर रोमांचांनी भरून गेलं. लगेच वस्तुस्थितीची जाणीव झाली व प्रसंगानुरूप कार्याला लागलो. शक्य तितक्या लवकर मातृभूमीला परत जायचं, असा पुन्हा निश्चय केला. मातृभूमि ही काय वस्तू आहे हे तिला सोडून बाहेर गेल्या शिवाय खऱ्या अर्थानं कळतच नाही. ज्यांना कशा विषयीच कांही वाटत नाही अशांची गोष्ट सोडा. पण बहुतेकांना आपल्या मातृभूमीला परत जाण्याची ओढ लागलेली असते. ब्रिटिश, फ्रेंच, जपानी, व्हिएटनामी मेक्सिकन अशा निरनिराळ्या देशांच्या विद्यार्थ्यांना मी भेटलो. प्रत्येकानं 'नथिंग लाइक आवर कंट्री' असेच उद्गार काढले. व्यक्तीनुरूप त्या भावनेच्या उत्कटतेत फरक असतो, व तो असणारच. अमेरिकेतील दोन वर्षांच्या वास्तव्यात माझी ही भावना कधीहि कमी झाली नाही. अनेकांनी 'तुम्ही इथलं वास्तव्य वाढवू शकता' असं मला म्हटलं. त्यात अमेरिकन होते तसे भारतीयहि. प्रत्येकाला 'मी शक्य तितक्या लवकर परत जाणार आहे' म्हणून सांगितलं. अमेरिकनांनी 'कां आमचा देश आवडत नाही?' म्हणून विचारलं, तर भारतीयांनी आश्चर्य व्यक्त केलं. माझी भावना मात्र नेहमी कायम राहिली. १९६२ च्या जूनमधे पश्चिमेकडे जाऊन पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावर उभा राहिलो व त्या अथांग महासागराच्या लाटाकडे पाहतांना पहिली कल्पना आली ती 'ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला.' स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या त्या उद्गारातील रहस्य त्या दिवशी मला खरं कळलं.

माझं अमेरिकेतील दोन वर्षांचं वास्तव्य अतिशय चांगलं पार पडलं. परत-ण्याचा दिवस माझ्या मनाशी पक्का ठरलेला असल्यामुळे बाकीच्या कामांची आखणी सुद्धा वेळापत्रकानुसार झाली. अमुक महिन्यात अमुक विषय पूर्ण करायचा, अमकी परीक्षा संपवायची असं आगाऊ ठरवून अगदी त्या वेळापत्रका बरहुकूम मी सर्व अभ्यासक्रम पूर्ण केला. 'थीसिस्‌चं अमुक प्रकरण अमक्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आठवड्यात देतो' असं मी माझ्या मार्गदर्शक प्रोफेसरला सांगत असे व त्या वेळी देत असे. शेवटी १ मे १९६३ रोजी माझ्या थीसिस्‌वरील तोंडी परीक्षेत मी उत्तीर्ण झालो व 'तुमचा प्रबंध मान्य केला' असं परीक्षकमंडळाच्या अध्यक्षानं सांगितलं तेव्हां माझ्या संबंधात आलेल्या दोघा तिघा प्राध्यापकांनी म्हटलं, 'It is creditable that you completed your programme on schedule. Perhaps you are the first in this university to earn Ph. D. in two years'. आणि हे विकट काम मी पार पाडू शकलो ते परत जाण्याच्या तळमळीमुळे.

अभ्यासक्रम यशस्वी रीत्या संपवून पीएच्. डी. ही पदवी मिळविली, आणि येवढंच करून मी परतलो असतो तरी माझी यात्रा सफल झाली असती. पण दोन वर्षांच्या काळात पूर्व किनाऱ्या पासून तो पश्चिम किनाऱ्या पर्यंत प्रवास करून त्या देशातील महत्वाची स्थळं पाहण्याची संधीहि मी साधली. पश्चिम किनाऱ्यावरील स्थळांप्रमाणेच पूर्व किनाऱ्यावरील न्यूयॉर्क, वॉशिंग्टन व फिलाडेलफिया ही शहरंहि मी पाहिली. न्यूयॉर्कला असताना तर एक संपूर्ण आठवडा संयुक्त राष्ट्र-संघाचं कामकाज पाहण्यात घालविला. वॉशिंग्टनला अमेरिकन पोलिटिकल सायन्स कॉन्फरन्सच्या अधिवेशनासाठी गेलो होतो. त्याचं कामकाज तर पाहिलंच, पण काँग्रेसच्या (म्हणजे तेथील संसदेच्या) बैठकांनाहि हजर राहिलो, व्हाइट हाऊस (म्हणजे अध्यक्षाचं सरकारी निवासस्थान) मधून फेरफटका मारला, आणि इतर प्रेक्षणीय स्थळं पाहिली. फिलाडेल्फिया शहर परतीच्या प्रवासात पाहिलं त्याचं वर्णन पुढे येईलच. मधेच एकदा मी व गयाचे सिव्हिल सर्जन डॉ. सिन्हा (हे एक वर्षासाठी सेंट लुईला हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशनचा अभ्यास करण्यासाठी आले होते. आता परतले असतील.) दक्षिणेतील टेनेसी ह्या राज्यात नाशव्हिल् ह्या शहरी जाऊन आलो. कांही दिवसांपूर्वीच त्या शहरात नीग्रोंनी एका हॉटेलात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता व पोलिसांनी त्यांना अडवलं होतं. आम्ही मुद्दाम त्याच हॉटेलात जेवायला गेलो. कांही झालं नाही. इतरांबरोबर जेऊन आलो. गंमत अशी की अनेक नीग्रो मुली त्या हॉटेलात कामाला होत्या. वाढीत होत्या, ताटं घेऊन जात होत्या. त्यांना कामासाठी तिथे प्रवेश आहे. पण जेवणासाठी नाही. आहे की नाही गोऱ्या संस्कृतीची गंमत ? सेंट लुईहून सुमारे शंभर मैलावर असलेल्या रॉला ह्या ठिकाणीं मी व गुप्ते (एंजिनिअरिंगसाठी आलेला मुंबईचा एक विद्यार्थी) एक दिवस जाऊन आलो. रोल्याला एंजिनिअरिंग स्कूल आहे. तिथली गंमत अशी की त्या स्कूलमधे १३० भारतीय विद्यार्थी त्या वेळी होते. त्या पैकी शंभरच्यावर गुजराथी होते व त्यांच्यांत सत्तर टक्के विद्यार्थ्यांचं आडनांव पटेल होतं. रोल्याच्या अमेरिकनांना भारतीयांचं आडनांव एकच असतं, व ते

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणजे पटेल असं वाटतं. दोघा–चौघा अमेरिकनांनी आम्हांला म्हटलं, 'I know your family name—Patel'. त्यांच्या त्या गैरसमजावर व पॅटेल ह्या उच्चारावर हंसल्याशिवाय उत्तरच देता येत नसे.

असे कितीतरी अनुभव, कितीतरी क्षेत्रातले अनुभव तिथे घेतले. त्या सर्वांविषयी लिहिण्याचं हे ठिकाण नव्हे. हे सर्व अनुभव घेत असता 'परत मातृभूमीला' हा मनाचा भाव कायम होता. तो स्थायिभावच होता. १९६२ साल संपत आलं तसं परतण्याचं वर्ष उजाडणार म्हणून मन उल्हसित झालं. १९६३ साल उजाडलं व जानेवारीच्या शेवटी डॅन्फोर्थ फाउंडेशन कडून 'तुमच्या परतीच्या प्रवासाची व्यवस्था शक्य तितक्या लवकर करायला लागा. फाउंडेशन तुम्हांला जास्तीत जास्त ६५० डॉलर्स देईल. बाकीचा खर्च आणि व्यवस्था तुम्ही करावी,' अशा आशयाचं पत्र आलं. तेव्हां पासून परतीच्या प्रवासाच्या अधिकृत हालचाली सुरू झाल्या.

दिनांक ८ फेब्रुवारी रोजी, डॅन्फोर्थ फाउंडेशननं सुचविल्या प्रमाणे, कौन्सिल ऑन स्टूडंट ट्रॅव्हेलच्या न्यूयॉर्क येथील कचेरीच्या डायरेक्टरला माझ्या परतीच्या प्रवासाची व्यवस्था करण्याबद्दल पत्र पाठवलं. पत्र अतिशय सविस्तर लिहिलं होतं; पुनःपुन्हा लिहायला नको म्हणून सर्व गोष्टी एकाच पत्रात लिहिल्या होत्या. त्यात 'मला १३ जुलै रोजी मुंबईला पोंहचायचं आहे; सर्व प्रवास विमानानं करायचा आहे; शक्यतो भारतीय विमानानं प्रवास करायचा आहे, वाटेत लंडन, पॅरिस, फ्रँकफुर्ट, जिनीव्हा, रोम व नेपल्स ह्या शहरी थांबायचं आहे;' इत्यादि माझा कार्यक्रम कळवून सामान पाठविण्याची व्यवस्था, युरोपात उतरावयाच्या हॉटेलची व्यवस्था, ठिकठिकाणचे व्हिसे व हेल्थ सर्टिफिकेट या विषयी माहिती विचारली होती. आठ दिवसात त्यांचे उत्तर आले की 'आम्ही ही व्यवस्था करू शकत नाही.' मला मोठा राग आला आणि डॅन्फोर्थ फाउंडेशननं तरी त्यांच्या द्वारा सर्व व्यवस्था करा असं कां लिहावं ते कळेना. मग डॅन्फोर्थ फाउँडेशनच्या कचेरीत फोन करून असोसिएट डायरेक्टर डॉ. हावर्ड रीड यांच्याशी बोललो व त्यांच्या सांगण्यावरून 'अमेरिकन एक्सप्रेस' कंपनीला २३ फेब्रुवारी रोजी न्यूयॉर्क येथे पत्र पाठविलं. पूर्वीचंच पत्र पुन्हा टाइप करून पाठविलं. 'अमेरिकन एक्सप्रेस' कंपनीकडून आठ दिवसात पत्र आलं. त्यात माझ्या प्रवासाचा संपूर्ण कार्यक्रम होता. २३ जून रोजी न्यूयॉर्क सोडण्यापासून तो १३ जुलै रोजी मुंबईच्या विमानतळावर उतरे पर्यंतचे सर्व वेळापत्रक त्यात होते. कोणत्या कंपनीच्या विमानानं कुठून निघायचं व पुढच्या मुक्कामाला किती वाजता पोंचायचं, विमानाचा उड्डाण क्रमांक कोणता वगैरे सर्व माहिती त्या पत्रात होती. मार्चच्या दुसऱ्या तारखेला मी मुंबईला १३ जुलै रोजी सकाळी ६–२५ वाजता पोचणार हे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मला कळलं होतं. मात्र नागपूरला त्या गोष्टीचा थांगपत्ता मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत लागूं दिला नाही. १ मे रोजी माझा थीसिस् मान्य झाल्या नंतरच नागपूरला प्रवासाचा कार्यक्रम कळवणारं पत्र टाकलं.

इकडे थीसिस्चं काम, प्रवासाच्या तयारीची कामं व इतर कार्यक्रम अशा विविध गोष्टींकडे लक्ष पुरवण्यात दिवस भराभर जात होते. दिवस जडहि जातात व लवकरहि जातात. एका वेळी वाटायचं अजून भारताला पोंचायला चार महिने !. तर कामाच्या दृष्टीने विचार केला की आता दिवस फार कमी राहिले असं वाटायचं.

'अमेरिकन एक्सप्रेस' कंपनी इतकी जगड्व्याळ संस्था, अनेक तऱ्हेचे उद्योग करते, पण कांही बाबतीत गिऱ्हाइकाला फसवते असं आढळून आलं. मला फ्रान्स, स्वित्झर्लंड व इटली त्या देशांचे 'व्हिसे' घ्यायचे होते. 'आम्ही सर्व व्हिसे घेऊन पाठवूं. प्रत्येक व्हिशामागे तीन डॉलर आमची फी राहील' असं त्यांनी कळवलं. कां होईना, बसल्या जागी व्हिसे देतात, गेले तर गेले नऊ डॉलर म्हणून मी माझा पासपोर्ट न्यू यॉर्कला त्यांच्याकडे पाठवून दिला. चार दिवसांनी त्यांचं पत्र आलं की फक्त स्वित्झर्लंडचाच व्हिसा न्यू यॉर्कहून मिळूं शकेल. ते तो घेऊन पाठवतील. फ्रान्सचा शिकागोहून घ्यावा लागेल व इटलीचा सेंटलुईलाच मिळेल. आणि हे दोन्ही व्हिसे घेण्याची मीच व्यवस्था करावयाची होती. हे आधीच सांगितलं असतं तर मी पासपोर्ट सरळ स्विस् वकालतीकडे पाठविला असता व शिकागोहून फ्रान्सचा व्हिसा घेतला तसा न्यूयॉर्कहून स्वित्झर्लंडचा घेतला असता. आणि माझे अमेरिकन एक्सप्रेसला फी म्हणून दिलेले तीन डॉलर वाचले असते. दुसरा अनुभव युरोपात माझ्यासाठी हॉटेलात जागा राखून ठेवण्या संबंधीच्या व्यवहाराचा. त्यांना पत्र लिहिलं त्यात मला रोज चार ते सहा डॉलर पर्यंतची जागा पाहिजे असं कळवलं होतं. त्यांनी उत्तरात असं भासविलं की येवढ्या किमतीला चांगली जागा मिळणंच शक्य नाही. मला आश्चर्यच वाटलं. मी डॅन्फोर्थ फाउन्डेशनच्या डायरेक्टरला सल्ला विचारला. त्यांनी 'येवढ्या किमतीला चांगली जागा मिळते. तुम्ही जास्त भाड्याची जागा घेतली तर कंपनीला कमिशनहि जास्त मिळते म्हणून ते तसा प्रयत्न करतात,' असं सांगितलं. त्यावरून मी अमेरिकन एक्सप्रेसला लिहिलं की त्या मर्यादे पर्यंत जागा मिळत असेल तर माझ्यासाठी राखून ठेवा, नस्ता मी काय करायचं ते करीन. त्यावर मात्र त्यांनी प्रत्येक शहरी मी घालून दिलेल्या मर्यादेच्या आत जागा रिझर्व केली. त्या त्या शहरी गेल्या नंतर मात्र असं आढळून आलं की तेवढ्याच किमतीला आणखी चांगली जागा मिळू शकते. निदान फ्रॅंकफुर्ट व जिनीव्हा येथे कांही भारतीय सहप्रवाश्यांना माझ्यापेक्षा कमी भाड्यात माझ्याहून चांगली व चांगल्या ठिकाणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मिळालेली जागा पाहिली. प्रत्येक विमानतळावर एक कचेरी असते. तिथे जाऊन हॉटेलात जागा रिझर्व करून हॉटेलाचा पत्ता घेऊन शहरात जाता येते. हे सर्व करायला अर्धापाऊण तास तिथे वेळ जातो व जागा रिझर्व केलेली असेल तर सरळ जाता येते इतकेच.

परतीच्या प्रवासाचं तिकीट व वाटेत उतरण्यासाठी हॉटेलात जागा रिझर्व करणे या महत्वाच्या गोष्टी आटोपल्या नंतर तितक्याच महत्वाच्या आणखी कांही गोष्टी उरकणं आवश्यक होतं. सर्व प्रवास विमानानं करायचा असल्यामुळे बरोबर चव्वेचाळीस पौंडाहून जास्त वजनाचं सामान ठेवता येणार नव्हतं. तेव्हां जास्तीचं सामान समुद्रमार्गे आधीच पाठवणं आवश्यक होतं. हे काम करणाऱ्या एकदोन कंपन्याकडे विचारणा केली. त्यांचे भाव बरेच महाग वाटले. मला पॅकिंगसुद्धा सर्व करणारा व कमी दरात करणारा असा एखादा एजंट हवा होता. एका भारतीया कडून अशा कंपनीचं नांव कळलं. कंपनीला फोन केला व मॅनेजर वेळ ठरवून घेऊन माझ्या अपार्टमेंटवर आला. त्यानं पुस्तकं व इतर सामान पाहिलं व खर्चाचा अंदाज केला. सव्वाशे डॉलर्सच्या जवळपास खर्च येईल असं त्यानं सांगितलं. दोनतीन दिवसांनी मी त्याला संमति कळवली. मेच्या १४ तारखेला त्याचा माणूस गाडी घेऊन आला व सर्व सामान घेऊन गेला. कंपनीत नेऊन, पॅक करून तो रवाना करणार होता. 'पॅक कसं करता ते मी पाहूं का ?' असं मी त्याला विचारलं. तो म्हणाला, 'इथं कुणी असं पाहात नाही. पण तुम्हाला पाहायचं असेल तर या.' मी 'येत नाही' म्हणून सांगितलं. त्यानंतर माझं सामान मी नागपूरला घरी आल्या नंतर सप्टेंबरच्या ८ तारखेलाच पाहिलं. माझ्याशी बोलताना ज्या पद्धतीनं पॅक करीन असं तो म्हणाला होता त्याच पद्धतीनं पॅक केलं होतं. सामानातून कांही गहाळ झालं नव्हतं. सर्व सामान जसंच्या तसं आलं. ही व्यापारी सचोटी आपल्याकडे येईल तो सुदिन.

आरोग्य–प्रमाणपत्रं घेणं हाहि एक महत्वाचा भाग होता. देवीप्रतिबंधक लस टोचल्याचं प्रमाणपत्र तीन वर्षं चालतं. मी दोन वर्षांनी परत निघालो होतो, तेव्हां ते नव्यानं घेण्याची गरज नव्हती. कॉलऱ्याचं घ्यावं म्हणून घेतलं. त्याची गरज नाही असं सांगण्यात आलं होतं. अमेरिकेला जाताना बऱ्याच सर्टिफिकेटांची आवश्यकता असते. तिथून दुसऱ्या देशात जाताना तितकी नसते. कारण अमेरिका सर्वसामान्य साथींच्या आजारापासून मुक्त आहे असं मानलं जातं. व ते खरंहि आहे. माझ्या दोन वर्षांच्या वास्तव्यात दोन्ही हिवाळ्यात फ्ल्यूची साथ मात्र कांही शहरातून पसरली होती. सेंटलुईमधेहि कांही शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या. आणि त्या साथीलाहि एशिअन फ्ल्यू असं म्हणत असत. ओळखीचे


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अमेरिकन गमतीनं म्हणायचे 'you brought it'. फ्ल्यूच्या तुरळक साथी शिवाय दुसरी कसली साथ मात्र तिथे दिसली नाही, ऐकण्यात आली नाही. वाटेंत प्रवासात अनेक ठिकाणचं पाणी प्यावं लागणार म्हणून मी कॉलरा प्रतिबंधक लस टोचून घेतली. ह्या संबंधींचं प्रमाणपत्रहि युनिव्हर्सिटीच्या आरोग्यकेंद्रातूनच घेता येतं. आपल्याकडच्या सारखं म्युनिसिपालिटीकडे जावं लागत नाही. तिथे लोकांच्या सोयीकडे लक्ष देऊन व्यवस्था करण्याची पद्धत आहे.

निघण्याचा दिवस जवळ आला तसं आणखी एक महत्वाचं काम उरकायचं आहे असं लक्षात आलं. मला मिळणाऱ्या फेलोशिपवर इन्कमटॅक्स नव्हता. पण इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट घ्यावं लागतं असं कळलं. सेंटलुई सोडण्याच्या फक्त आठ दिवस आधी मी तेथील इन्कमटॅक्स कचेरीत गेलो. पांचच मिनिटात मला आतून बोलावणं आलं. एका महिलेनं खुर्चीवर बसायला सांगून कामाची चौकशी केली. मी काम सांगताच तिनं एक फॉर्म काढला, माझा पासपोर्ट पाहून त्यात माहिती भरली व डॅन्फोर्थ फाउंडेशनचं तुम्हांला फेलोशिप दिल्याचं पत्र आहे का, म्हणून विचारलं. पत्र माझ्याजवळ नव्हतं. तिथे घरी सुद्धा नव्हतं. मी ते सामाना बरोबर नागपूरला पाठवून दिलं होतं. तिला तसं सांगितलं. 'वेट अ मिनिट' असं मला म्हणून तिनं डॅन्फोर्थ फाउंडेशनला फोन केला व डायरेक्टरशी बोलून मी म्हणतो त्याची खात्री करून घेतली, आणि भराभर फॉर्मवरचे कांही कॉलम भरून सही करून 'हिअर यू आर, सर' म्हणून स्मित करीत माझ्या हाती सर्टिफिकेट दिलं. 'थ्यँक्यू व्हेरी मच्' म्हणून मी तिचा निरोप घेतला. त्या कचेरीत मी फार तर वीस मिनिटे होतो. अमेरिकेत कोणत्याहि ऑफिसात जाऊन काम करून घ्यायला कांही वाटत नाही. 'उद्या या, पुन्हा या, त्या खिडकीकडे जा' असं कुणी म्हणत नाही. प्रत्येक क्लर्क व अधिकारी स्मित केल्या शिवाय बोलत नाही. बसायला खुर्ची मिळतेच. त्यामुळे आपण प्रतिष्ठित नागरिक आहोत असं वाटतं. आपल्याकडचा साराच प्रकार निराळा. इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेटा संबंधीचा नागपूरचा अनुभव ह्या संदर्भात सांगण्या सारखा आहे.

इथून अमेरिकेला जाताना इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट घ्यावं लागतं असं कांही जणांनी सांगितल्यावरून मी चार महिने आधी अर्ज केला. आठ दिवसांनी पुन्हा कचेरीत गेलो तर अर्ज तसाच पडून होता. मग पंधरा दिवसांनी तुमचे मागचे पांच वर्षांचे रिटर्नस् भरून पाठवा म्हणून कळवण्यात आलं. ते तावडतोब भरून दिले. कांही बाकी निघाल्यास ती भरली की सर्टिफिकेट मिळेल असं सांगण्यात आलं. मी वाट पाहात राहिलो. दरम्यान मला माझ्या ट्रॅव्हेल एजंटानं कळवलं की 'आता नियम बदलला आहे. कांही दिवसांसाठी परदेशी जाऊन येणारांना अशा सर्टिफिकेटाची गरज नाही.' म्हणून मी तो नाद सोडला.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण इन्कमटॅक्स कचेरीत कांही मला सर्टिफिकेट नको असं कळवलं नाही. त्याचा अर्थ माझा अर्ज कायम आहे असा होतो. आता मी अमेरिकेला जाऊन परतहि आलो. अजून मला नागपूरच्या कचेरीतून इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट मिळालं नाही !

अशी सर्व तयारी करून, १० जूनला झालेल्या पदवीदान समारंभात डॉक्टरेटची पदवी घेऊन १४ जून रोजी मी सेंटलुइ सोडलं. मातृभूमीला परत जाण्यासाठी अतिशय उत्सुक असलेल्या मला सेंटलुइ सोडताना वाईट वाटल्या वाचून राहिलं नाही. ज्या शहरात दोन वर्षं वास्तव्य केलं, कांही मित्र जोडले, जिथे अध्ययन करून अत्युच्च पदवी संपादन केली; ते शहर सोडताना, व पुन्हा कधी त्याचं दर्शन घडण्याची शक्यता नसताना, थोडंफार दुःख होणं साहजिक आहे. तिथून निघण्या पूर्वी माझ्या अमेरिकन मित्रांनी मला मेजवान्या दिल्या, भेटी दिल्या, व अभिष्ट चिंतिलं. त्या सर्वांचा व भारतीय मित्रांचा निरोप घेऊन मी परत मातृभूमीकडे निघालो. तो दिवस, त्या दिवसाची भावना कधीहि विसरणं शक्य नाही. दुपारी एक वाजता ग्रे हाउंड कंपनीच्या बसनं फिलाडेल्फियाला जाण्यासाठी मी सेंटलुइ सोडलं.

× × × ×

सेंट लुईहून दुपारी एक वाजता निघालो ते फिलाडेल्फियाला दुसरे दिवशी साडे अकरा वाजता पोंचलो. त्या दिवशी बस सेंटलुईहून एक तास उशीरा निघाली व फिलाडेल्फियालाहि एक तास उशीरा पोंचली. वाटेत वेळ भरून निघाली नाही. चोवीस तासांच्या प्रवासात मी अगदी एकटा होतो. मधूनच बाजूच्या सीटवर बसलेल्या अमेरिकनाशी बोलणे होत असे तेवढंच. आता सबंध प्रवासात तीन आठवडे मी एकटाच राहणार आहे याची जाणीव झाली.

फिलाडेल्फिया शहर सेंटलुइ पासून सुमारे अकराशे मैलावर पूर्व किनाऱ्यावर आहे. न्यूयॉर्कच्या दक्षिणेला सुमारे शंभर मैलावर आहे. दीडशे वर्षांपूर्वी न्यूयॉर्क व फिलाडेलफिया या दोन शहरात मोठेपणासाठी स्पर्धा होती. पुढे न्यूयॉर्कसारखे वाढतच गेले व फिलाडेल्फियानं स्पर्धेतून अंग काढून घेतलं. आज फिलाडेल्फियाची लोकसंख्या सुमारे बावीस लक्ष आहे. तर न्यू यॉर्कची ऐंशी लक्ष. त्या दृष्टीने न्यूयॉर्क अमेरिकेतील पहिल्या क्रमांकाचं व फिलाडेल्फिया चौथ्या नंबरचं शहर आहे. उद्योगधंदे व व्यापाराच्या दृष्टीनेहि न्यूयॉर्क फिलाडेल्फिया पेक्षा खूपच पुढे गेलेलं आहे. न्यूयॉर्क ज्याप्रमाणे न्यूयॉर्क राज्याची राजधानी नाही त्या प्रमाणेच फिलाडेल्फियाहि पेन्सिल्व्हेनिया राज्याची राजधानी नाही. पे सिल्व्हेनियाची राजधानी हॅरिसबर्ग नांवाचं शहर आहे. त्याचं नांव सांगितल्या



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शिवाय कुणाला माहीत होत नाही. शहराचं महत्व राजधानी असण्यावर अवलंबून नाही हे आपल्याला जितक्या लवकर कळेल तितकं चांगलं होईल.

फिलाडेल्फियाला पोंचताच सरळ वाय्. एम्. सी. ए. मध्ये गेलो. तिथे आधीच मी जागा राखून ठेवायला लिहिलं होतं. त्या प्रमाणे एक खोली माझ्यासाठी राखून ठेवलेली होती. खोलीचं भाडं रात्रीचे चार डॉलर. खोलीत पलंग, पलंगावर अंथरूण–पांघरूण, टेबल, टेबल लँप, टेलीफोन, एक लिहायची खुर्ची, एक आराम खुर्ची, एक कपड्याचं कपाट, त्यात भरपूर हँगर्स, इत्यादि व्यवस्था होती. रोज एक टॉवेल, दोन नॅपकिन्स व एक सावणाची लहान वडी मिळत असे. पाणी पिण्यासाठी ग्लास होता व टेबलावर एक बायबलची प्रत होती. कोणत्याहि वाय्. एम्. सी. ए. मधील खोलीत अशी व्यवस्था असते. एक, दोन किंवा तीन पलंग असलेल्या खोल्या मिळतात. डबल्‌बेडची खोलीहि असते. व्हरांड्यात कुठेतरी स्नानगृहं असतात. एक गोष्ट मात्र आपल्याला विचित्र वाटते, शरमेची वाटते. कांही ठिकाणच्या संडासांना दारं नसतात व एकाच खोलीत पांच–सहा फवाऱ्या खाली तितकेजण अगदी विवस्त्र होऊन आंघोळ करतात. पुढारलेल्या अमेरिकेतील ही काय पद्धत आहे ती त्यांनाच माहीत. आंघोळी नंतर टॉवेलाने अंग पुसत दोघेतिघे तशाच अवस्थेत गप्पाहि मारीत असतात. अमेरिकेत, पाय ठेवल्या पासून हे दृश्य मला पाहावं लागलं. किळस वाटायची. ही कसली संस्कृति आहे कोण जाणे ! आपल्याकडच्या वाय्. एम्. सी. ए. मधे हे न येवो म्हणजे मिळवली.

माझ्या तीन दिवसाच्या वास्तव्यात पेन्सिल्व्हेनिया युनिव्हर्सिटी, इंडिपेंडन्स हॉल, प्लॅनेटेरियम्, म्यूझियम व इतर कांही प्रेक्षणीय स्थळं पाहिली. पेन्सिल्व्हेनिया विद्यापीठात दोन भारतीय डॅन्फोर्थ फेलोज् होते. एक माझ्या आधीच्या तुकडीतला केरळातील सत्यपालन् व दुसरा माझ्या बरोबरच आलेला पंजाबातील भाटिया सत्यपालनचा टेलिफोन नंबर माझ्या जवळ होता. गेल्या दिवशी आंघोळ वगैरे आटोपताच मी त्याला फोन केला. तो अपार्टमेंटमधेच होता. त्यानं कोणत्या वसनं कसं यायचं वगैरे समजावून सांगितलं. त्या प्रमाणे मी त्याच्या अपार्टमेंटवर गेलो. हाच सत्यपालन् आम्ही प्रथम न्यूयॉर्क बंदरात उतरलो त्या वेळी आम्हांला मदत करण्यासाठी फाउंडेशनच्या सूचनेवरून तिथे आला होता. ओळखीचा माणूस भेटल्यामुळे आनंद वाटला. त्यानं पेन्सिल्व्हेनिया विद्यापीठ दाखवलं. हे विद्यापीठ बरंच जुनं व अमेरिकेतल्या प्रसिद्ध विद्यापीठांपैकी एक आहे. त्या विद्यापीठाच्या अनेक इमारती एक चौरस मैलाच्या परिसरात पसरल्या आहेत. मात्र स्वतंत्र वेगळं कॅंपस नाही. ह्या विद्यापीठात शंभरच्यावर भारतीय विद्यार्थी आहेत. मुख्य म्हणजे साउथ एशियन स्टडीज् डिपार्टमेंट नांवाचा वेगळा विभाग मुख्यत: भारत व त्याच्या शेजारी देशांचा अभ्यास करण्यासाठी ह्या विद्यापीठात आहे. त्यामुळे बरेच

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राध्यापक भारतात जाऊन आलेले व भारताशी परिचित आहेत. सत्यपालन् राज्यशास्त्रात पीएच्. डी. साठी अभ्यास करीत होता. माझाहि तोच विषय असल्यामुळे मी त्याच्या प्राध्यापकाला भेटायला त्याच्या बरोबर गेलो. डॉ. नॉर्मन पॉमर भारतात बरेच वेळां येऊन गेलेले आहेत. त्यांना भारतातील राज्यशास्त्राच्या प्राध्यापकांची इतकी माहिती आहे की त्यांच्याशी बोलताना एखाद्या भारतीय प्राध्यापका बरोबरच बोलत आहे असं वाटलं. सुमारे एक तासभर मी त्यांच्याशी बोलत बसलो होतो.

साउथ एशियन स्टडीज् डिपार्टमेंटमधे सोलापूरचे डॉ. नरेश कवडी मराठी–इंग्रजी कोश तयार करीत आहेत. ते पूर्वी आकाशवाणीवर मराठीत बातम्या सांगत असत. त्यामुळे त्यांच्या नांवाचा मला चांगलाच परिचय होता. माझे कांही लेख वाचल्यामुळे मीहि त्यांना नांवाने परिचित होतो. पण एकमेकांना भेटलो मात्र नव्हतो. सेंटलुईला असलेला गुप्ते मधेच एकदा फिलाडेल्फियाला जाऊन आला होता. त्याची व कवडींची भेट झाली होती. त्यावरून ते तिथे आहेत हे मला कळलं होतं. सत्यपालन् कडून मी त्यांचा फोन नंवर घेतला व त्यांना फोन केला. त्यांनी दुपारी जेवायलाच तिकडे बोलावलं. मला फिलाडेल्फियात जाऊन एक दिवस झाला होता. त्यामुळे कांही सडका व बसमार्ग परिचयाचे झाले होते वसनं ११ वाजता मी कवडींच्या घराजवळ उतरलो. घर नंवर पाहात त्या भागातून दोन तीन चकरा मारल्या, पण कवडींच्या घरचा नंवर सापडेना. मग एका गृहस्थाला विचारलं. त्यानं मी उभा होतो तिथल्याच इमारतीकडे बोट दाखविलं. मी त्या घरावरून दोन तीन वेळा गेलो होतो. पण हे घर आहे ही कल्पनाच आली नाही. दर्शनीभाग अमेरिकेतील घरांना न साजेसा होता. पुढच्या पायरीचे एकदोन दगड पडले होते. बाजूला गवत उगवलं होतं. व भितीवर शेवाळ चढलं होतं. भारतातील घरांच्या दर्शनी भागाची आठवण झाली. दारावरील नंवराचा आकडाहि पुसट झाला होता. आत जाऊन कवडींचं नांव ज्या वटन जवळ होतं ती वटन दावली. लगेच दारा जवळ एक 'वझर' वाजला व दार उघडलं. फिलाडेल्फियात बहुतेक इमारतीमधे अशी व्यवस्था आहे. पहिलं दार उघडून आत जायचं व ज्या अपार्टमेंटमधे जायचं असेल त्याच्या नंबरा जवळची बटन दाबायची. अपार्टमेंटमधे घंटा वाजते. तिथे एक बटन असते. ती दाबली की खालच्या दारावर वझ्ऽऽ असा आवाज करणारी घंटा वाजते व दार मोकळं होतं. त्या योजनेनं चोरापासून संरक्षण मिळतं व दार उघडायला यायची दगदगहि वाचते.

मी वर जाई पर्यंत डॉ. कवडी अर्धा जिना उतरून आले होते. त्यांनी मला वर नेलं. त्यांचं अपार्टमेंट चांगलंच प्रशस्त व हवाशीर होतं. तिथून बाहेरचा देखावा फार सुंदर दिसत होता. सौ. कवडी आणि त्यांची दोन लहान मुल



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

यांचाहि परिचय झाला. आमच्या गप्पागोष्टी अशा कांही रंगल्या की थोड्याच वेळात आम्ही फार जुने स्नेही आहोत असं वाटायला लागलं. आम्ही तसं बोललोहि.

त्यांच्याकडे मी पोंचल्या पासून रात्री ११ वाजेपर्यंत आम्ही बरोबरच होतो. अस्सल महाराष्ट्रीय पद्धतीचं जेवण त्यांच्याकडे मिळालं. बरेच दिवसात हातांनी जेवलो नव्हतो. त्या दिवशी आपण भारतातच आपल्या स्नेह्याकडे जेवीत आहोत असं वाटलं. त्या दिवशी आम्ही फिलाडेल्फियाचा इंडिपेंडन्स हॉल पाहिला. ह्याच ठिकाणी १७८७ मधे अमेरिकेची घटना परिषद भरली होती. तिथेच तयार केलेली घटना आजहि थोड्याफार फरकाने, अमेरिकेत अमलात आहे. मला त्या स्थळाचं विशेष महत्व वाटलं. तिथेच 'लिबर्टी बेल' नावाची प्रचंड घंटा आहे. आता तिला तडा गेला आहे म्हणून ती वाजवीत नाहीत. त्याच दिवशी प्लॅनेटेरियम पाहिलं. सेंट लुईला नुकतंच प्लॅनेटेरियम सुरू झालं होतं. पण ते पाहण्याचं मनात असूनहि राहून गेलं. सेंट लुईच्या प्लॅनेटेरियमचा विशेष हा की तिथली यंत्र सामुग्री जपानी आहे व ती बसवण्यासाठी जपानी तंत्रज्ञ आले होते. अमेरिकेत सध्या जपानी मालाला फार प्रतिष्ठा आहे व तिथे तो खपतोहि पुष्कळ. कोणत्या एका आशियाई राष्ट्राविषयी आपुलकी व आदर अमेरिकेत असेल तर ती जपान विषयी आहे. जपानचं तिथे फार कौतुक होतं.

फिलाडेल्फियाचं प्लॅनेटेरियम मला उत्कृष्ट वाटलं. वर्तुळाकार इमारतीत बसल्यावर एकदा दिवे मालवले गेले व वरच्या घुमटाकार छतावर प्रकाश सोडण्यात आला की आपण उघड्यावर बसून आकाश व तारे पाहतो आहोत असं वाटतं. पहाटेचा प्रकाश, संध्याकाळचा प्रकाश, मध्य रात्रीचं आकाश, वगैरे इतके हुबेहुब असतं की आपण कृत्रिम कांहीतरी पाहात आहोत हे विसरून जातो. तारे, चंद्र, व सूर्य यांची स्थानं, मार्ग व गति सर्व दाखवण्यात येतं. सोबत विनोदी व माहितीपूर्ण भाष्य असतं. करमणूकच्या करमणूक व जोडीला ज्ञान-प्राप्ति. बाहेर आल्यावर एकच तक्रार करण्यासारखी असते. खुर्चीवर बसून वर मान करून सारखं पाहात राहण्यानं मान अवघडून जाते. मानेला आधार देण्याची सोय, केस कापण्याच्या दुकानात असते तशी, केल्यास चांगलं होईल.

कवडींच्या बरोबर त्यांच्या डिपार्टमेंटमधे गेलो. तिथे त्या विभागाचे प्रमुख डॉ. साउथवर्थ यांची भेट झाली. साउथवर्थ माझ्याशी शुद्ध मराठीत पंधरा मिनिटं बोलत होते. माझ्या बोलण्यातच इंग्रजी शब्द यायचे पण त्यांच्या बोलण्यात एकहि इंग्रजी शब्द आला नाही. उच्चारहि चांगलेच शुद्ध. पुण्याला राहून ते मराठी शिकले. मी त्यांना मला वाटत असलेलं कौतुक बोलून दाखविलं. नंतर



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ते कवडींना 'कां तुझ्या मित्रावर इंप्रेशन मारलं का नाही ?' असं म्हणाल्याच कवडींनी मला सांगितलं. डॉ. साउथवर्थना भेटून व त्यांच्याशी मराठीत बोलून फार आनंद झाला. त्या बरोबरच थोडा विषादहि वाटला. त्या लोकांमधे किती चिकाटी व किती ज्ञानलालसा. त्या बरोबरच आपली भूमिका कायम ठेवण्याची दृष्टि. ज्ञान मिळवतील पण त्याचा अर्थ अमेरिकन दृष्टिकोनातून लावतील. कधीहि परक्यांच्या आहारी जाणार नाहीत, परक्यांचं श्रेष्ठत्व मान्य करणार नाहीत.

फिलाडेल्फियाला माझ्या बरोबरच आलेला भाटियाहि होता. त्याच्याकडेहि गेलो. त्यानं आपल्या पत्नीला व मुलाला बोलावून घेतलं आहे. तो पक्का गृहस्थाश्रमी बनला होता. त्याच्याकडे चांगलं पंजाबी परोटयांचं जेवण केलं. एकाच तुकडीत आम्ही अमेरिकेत गेलो होतो. त्यामुळे एकमेकांचे अनुभव सांगण्यात व ऐकण्यात वेळ कसा गेला ते कळलं नाही. तो लिंग्विस्टिक्स मधे पीएच्. डी. करीत आहे. त्याच्या प्रोफेसरानं गणिताचे दोन कोर्सेस् करावे लागतील म्हणून सांगितल्यामुळे तो पेचात आला होता. अमेरिकेतल्या शिक्षणपद्धतीत प्रोफेसरावर सर्व कांही अवलंबून असते. चांगल्या प्रोफेसराशी गाठ पडली तर ठीक, नाही तर अनेक प्रकारच्या कोर्सेसमधे गटांगळ्या खात बसावं लागतं. म्हणूनच 'केव्हां परतेन ते सांगता येत नाही' असं भाटिया म्हणाला.

डॉ. कवडींच्याकडे बऱ्याच महाराष्ट्रीयांच्या भेटी झाल्या. अगदी आपल्या वातावरणात असल्यासारखं वाटलं. सेंट लुईला ओळखीची सर्व मंडळी सोडून एकाकी प्रवासाला निघालो तेव्हां वाईट वाटलं होतं. फिलाडेल्फियाच्या त्या मंडळीच्या सहवासात मी एकटेपणा विसरून गेलो. नागपूरचं पत्रहि फिलाडेल्फियाला आलं होतं. माझे सर्व ठिकाणचे पत्ते नागपूरला आधीच कळवले असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी मला घरचं पत्र मिळत गेलं. आधी हॉटेलात जागा राखून ठेवण्यात ही सोय असते. त्या साठीच मुख्यत: मी तशी व्यवस्था केली होती. नागपूरला व सेंटलुईच्या मित्रांना पत्रं टाकून मी १८ जून रोजी फिलाडेल्फियाहून इथाकाला जायला निघालो.

(अपूर्ण)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# नामदेवांच्या गाथ्यातील एक प्रक्षिप्त प्रकरण–

प्रा. भा. श्री. परांजपे

संतश्रेष्ठ नामदेवांच्या आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या साऱ्याच गाथ्यात प्रक्षिप्त अभंगांची सरमिसळ आहे हे मत आता सर्वमान्य झालं आहे. पण असे प्रक्षिप्त अभंग कोणते आणि त्यांच्या प्रक्षेपाच्या खुणा कोणत्या याविषयीचा विचार मात्र अजून व्हावा तसा झालेला दिसत नाही. सरकारने नेमलेल्या विद्वन्मंडळाने संपादिलेला नामदेवांचा गाथा आज उद्या जेव्हा प्रसिद्ध होईल तेव्हा त्यात अशा साऱ्या प्रक्षेपांची यथायोग्य वाट लागेल अशी आशा वाटते. परंतु तो सुदिन उगवेपर्यंत नामदेव वाङमयाच्या अभ्यासकांना हे प्रक्षेप असेच छळत राहणार त्याची काय वाट ? आमच्यामते सध्याच्या परिस्थितीत स्वत: अभ्यासकांनीच नामदेवांच्या चरित्रपर प्रकरणांचा अभ्यास करून प्रकरणवार प्रक्षेपांची छाननी केली तर ती गोष्ट या चिकित्सेला एक निश्चित वळण लावणारी ठरेल. याच दृष्टीने प्रस्तुत लेखात नामदेवांच्या गाथ्यातील 'ज्ञानदेवाच्या भेटीसाठी नामदेवांची आळ' या २१ अभंगाच्या प्रक्षिप्त वाटणाऱ्या एका प्रकरणाची तोंड ओळख करून घेण्याचा विचार आहे.

## 'नामदेवाची आळ' विषय

'नामदेवाची आळ' हे नामदेवांच्या गाथ्यातील प्रकरण आज घटकेला नामदेवांनी लिहिलेल्या 'समाधि प्रकरणा'चे एक अविभाज्य अंग मानले जाते. तेव्हा या प्रकरणाची भिन्नता अजमावून पाहण्याच्या दृष्टीने समाधिप्रकरणातील विषय, प्रयोजन, रचना इत्यादि गोष्टींशी याची तुलना करणे आवश्यक ठरेल. प्रस्तुत लेखात ही तुलना करताना वा अभंगांचा उल्लेख करताना आवटे यांचा सकळ संतगाथा लेखकाने आपल्या नजरेसमोर ठेवलेला आहे.

या समाधि प्रकरणाचा विचार करताना एक गोष्ट प्रथमच ध्यानात घ्यावयास हवी. ती म्हणजे हे समाधिप्रकरण गाथ्यातील ज्ञानदेव समाधिमाहात्म्य या प्रकरणाहून भिन्न आहे. बहुतेक गाथ्यातून आधी हे समाधिमाहात्म्य, मध्ये ज्ञानदेवादि चार भावंडांच्या समाधीचे वर्णन आणि त्यानंतर हा आळीचा प्रसंग असा एकंदर छपाईचा क्रम दिसतो. या साऱ्या प्रकरणापैकी ज्ञानदेवादि चार भावंडांच्या समाधी–वर्णनाच्या भागाला आम्ही 'समाधि प्रकरण' म्हणतो. हे



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रकरण आवटे यांच्या गाथ्यात क्र. १०३५ ते १२१८ इतक्या अभंगात दिलेले असून पुढे आळीचे प्रकरण क्र. १२१९ ते क्र. १२४२ अशा २४ अभंगात आहे. तुकाराम तात्या यांनी १८९४ साली प्रसिद्ध केलेल्या आळीच्या प्रकरणात २२ अभंग आहेत आणि त्यातील शेवटचा (२२ वा) अभंग आवटे गाथ्यात वदलून आलेला आहे. या दोन्ही गाथ्यात पहिले २१ अभंग मात्र दोन्हीकडे सारखे आहेत आणि म्हणून या २१ अभंगा पुरताच या प्रकरणाचा विचार आपण प्रस्तुतच्या लेखात करीत आहोत.

या २१ अभंगाची विषयवार वर्गवारी अशी आहे.

मंगलाचरण व आख्यानाचा विषय (क्र. १) आख्यानाचा आरंभ–नामदेवांच्या दुःखाचे कारण देव विचारतात (क्र. २) नामदेवांचे भाषण (क्र. ३–६) नामदेवांची अवस्था पाहून देवाला आश्चर्य वाटते (क्र. ७) देवाचे सांत्वनपर भाषण (क्र. ८–१२) नामदेवांचे आग्रह पर भाषण (क्र. १३–१४) जगन्माता रुक्मिणीची नामदेवाचा हट्ट पुरविण्याबद्दल देवाला विनंति आणि देवांनी दिलेली संमति (क्र. १५) गरुडाजवळ पुंडलीकासाठी निरोप (क्र. १६) पुंडलीक ज्ञानदेवासह विमानातून येतात. रुक्मिणी देवाला विमान आलेलं दाखविते (क्र. १७) देव नामदेवास ज्ञानदेवाला भेटण्यास सांगतात (क्र. १८) ज्ञानदेवास पाहून नामदेवाचा हर्ष आणि ज्ञानदेवाशी भाषण (क्र. १९–२०) ज्ञानदेवांचे नामदेवाविषयीचे उद्गार (क्र. २१)

## 'नामा म्हणे' ही नाममुद्रा नाही

'नामदेवांची आळ' ही नामदेव निर्मित नव्हे या गोष्टीचा महत्वाचा पुरावा म्हणजे या २१ अभंगात कुठेहि अभंगाच्या अखेरीस 'नामा म्हणे' ही नामदेवांची नाममुद्रा नाही. विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट ही की खुद्द नामदेवांची भाषणे ज्या अभंगात आली आहेत त्या अभंगातहि ही मुद्रा नाही. ज्या अभंगात नामदेवांचा मुळीच उल्लेख नाही अशा अभंगाचा हा उपसंहार पाहा:

१. इच्छी परी मन ज्ञानशक्तिक्षीण
 धरितो चरण नाथजींचे ।। १२१९.४

२. तुमचे दर्शन ज्ञान कृपादान
 पंढरीस येणे ह्याच साठी ।।१२२१.५।।

३. पंढरीचे जे का सुख : जाणे तो एक भाविक ।।१२२२–४।।

४. माझ्या कृपाळुवा देवा : हांके सरशा येशी धावा ।।१२२३–५।।

५. विठाबाई तू ग जाणसी ना जाण
 रक्षी मज कोण दुजे येथे ।। १२२४.५।।



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

६. रामकृष्ण रे गोविंद । जप म्हणे तो मुकुंद ॥१२२७

७. पंढरीचा राणा सांगतो ह्या खुणा
भक्तांच्या कारणा येणे मज ॥ १२२८.४

८. ज्ञान समाधि हे नाशी रूप नावा
अंतीचा मेळावा मजमाजी ॥१२२९.४

९. हाटी उदमी भाविक । विठूराजा त्या ग्राहिक ॥१२३३.६

१०. करी पांडुरंग येई त्याच्या मना
निमित्ताकारणा भक्त शोधी ॥१२३४.४

११. पुढे तो गरूड मागे ये विमान
रुक्मीण दुरोन दावी देव ॥१२३५–५॥

१२. सदा आठवती मना । तुझ्या भक्तीच्या कल्पना

या प्रकरणातील उरलेल्या ९ अभंगात नामदेवांचा जो उल्लेख आला आहे तो कुणीतरी संबोधून बोलल्यासारखा किंवा घटनेच्या संदर्भात केलेल्या तटस्थ निवेदनासारखा दिसतो.

१. पुसे रुक्मिणीकांत का रे तू निवांत
नाम्या शोकाक्रांत कोण्या दुःखे ॥१२२०.४

२. प्रेमा उचंबळे ऐकता ही आळ
बुझावी गोपाळ नाम्यालागी ॥ १२२५–४

३. नाम्या उमज मानसी । ऐसे म्हणे हृषीकेशी ॥१२२६.४

४. पांडुरंग म्हणे ऐक नाम्या ज्ञान
वाटो समाधान तुझ्या जीवा ॥ १२३०.४

५. नामदेवाठायी प्रेम । मार्गी आडविले ब्रह्म ॥ १२३१. ६

६. पुरवा नामयाच्या आर्ता । देवा सांगे जगन्माता ॥१२३२.५

७. देव म्हणे नाम्या घेई भेटीसुखा
ज्ञानदेव सखा उभा येथे ॥१२३६.४

८. नामा भेटे ज्ञानदेवा । जना प्रसाद मिळावा ॥ १२३८–५ ॥

९. ज्ञानदेव म्हणे तू विठोचा लाडिवाळ
नामया तू कृपाळ आम्हावरी ॥१२३९.३॥

एकंदरीत आवटेगाथ्यातील १२१९ ते १२३९ पर्यंतच्या २१ अभंगात नामा म्हणे ही मुद्रा अभंगाच्या अखेरीस कुठेच आढळत नाही. 'नामा म्हणे देवा ज्ञानदेव दृष्टी' हा क्र. १२२१ च्या आणि नामदेव म्हणे देवा हा क्र. १२३१ च्या आरंभीचे चरण नामदेवांच्या भाषणास आरंभ झाल्याचे द्योतक

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आहेत कारण पुढे क्र. १२२६–१२३० पर्यंतच्या देवाच्या सांत्वनपर भाषणाचा जो गट आहे त्याचा आरंभहि 'देव म्हणे नाम्या पाहे' (क्र. १२२६०१) असा केलेला आढळतो. अभंगाच्या अखेरीऐवजी आरंभास आणि तीहि त्या भाषणाच्या गटाच्या आरंभास 'नामदेवा'चा जो उल्लेख आहे तो भाषणाचा प्रारंभ दाखविणारा आणि म्हणूनच कर्त्याच्या तटस्थ निवेदनाचा द्योतक ठरतो.

आळीच्या, या प्रकरणातील २१ अभंगात नामदेवांची नित्याची 'नामा म्हणे' ही मुद्रा अभंगाच्या अखेरीस कुठेच आढळू नये ही गोष्ट प्रक्षेपाची बाह्य खूण या दृष्टीने तरी उल्लेखनीय ठरावी.

## समाधि–प्रकरणाशी विसंगत असे भाग

प्रक्षेपाच्या बाह्य खुणा दर्शविणारी दुसरी गोष्ट म्हणजे या प्रकरणाचा नामदेवकृत समाधि प्रकरणातील कांही घटनाशी येणारा विरोध ही होय. उदाहरणार्थ आळीच्या प्रकरणातील अभंग पाहा:—

अळंकापुरीस पांडुरंग गेले
समाधिस्थ केले ज्ञानदेवा
उरकोनी सोहळा संगे संतमेळा
विठोबा राहिला आळंदीस ॥१२२०

यातील दूसऱ्या चरणाचा अर्थ श्री. सुवंध यांच्या गाथ्यात 'संतमंडळीसह सोहळा पूर्ण केल्यानंतर विठ्ठलरायांनी आळंदीस वास्तव्य केले! असा दिलेला आढळतो. यावद्दल ज्ञानदेवांच्या समाधीचा सोहळा पूर्ण झाल्यानंतरहि विठ्ठलाचे आळंदीस कांही दिवस वास्तव्य झाले असे या 'आळ' कर्त्याचे म्हणणे दिसते. परंतु नामदेवकृत ज्ञानेश्वरसमाधीच्या वर्णनात समाधीचा सोहळा पूर्ण होताच विठ्ठल लागलीच परत निघाले असे सांगितलेले आढळते, इतकेच नव्हे तर निश्चित तिथी दिवस देण्याच्या नामदेवांच्या पद्धतीप्रमाणे देव आळंदीहून केव्हा परतले तेही त्यांनी निश्चित सांगितले आहे. तो अभंग असा:–

नव दिवस संत समाधी जवळी
देव चंद्रमौळी कीर्तनासी ॥२॥
शुद्ध मार्गेश्वर दशमी भोजने
विधि नारायणे संपादिली ॥३॥
त्रयोदशी देव निघाले वाहेरी ... ११०३

ज्ञानेश्वरसमाधीच्या प्रकरणाशी विसंगत वाटणारी दुसरी घटना म्हणजे देवानी गरूडास पुंडलीकाकडे ज्ञानदेवास आणण्यासाठी पाठविले ही होय. 'आळ'कर्त्यानी ही घटना पुढील २ अभंगात सांगितलेली आहे ती अशी:–

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गरुडासी मग म्हणे पांडुरंग
साकल्य हे सांग पुंडलीका
नामदेव कष्टी ज्ञानदेवासाठी
घेऊन या तो भेटी नामयाच्या ॥१२३४॥
पुंडलीके तेव्हा गरुड पूजियेला
ज्ञाना वैसविला विमानात ॥१२३५॥

ज्ञानेश्वर समाधीच्या प्रकरणावरून पाहता पुंडलीक आणि विठ्ठल हे एकमेकापासून दूर असल्याचे संभवनीय दिसत नाही. कारण या साऱ्या प्रसंगी पुंडलीक आरंभापासून अखेरपर्यंत या समाधीच्या सोहळचाला उपस्थित होते. ते पांडुरंगावरोवरच आळंदीस आले आणि पांडुरंगावरोवरच परत गेले. ज्ञानेश्वर-समाधीच्या प्रकरणात पुंडलीकांचा उल्लेख तीन ठिकाणी आला आहे तो असा:—

१. विठ्ठल रुक्मिणीसहित गरुड हनुमंत
आणिक संतमहंत जमा झाले ॥
परिसा भागवत नाभा पुंडलीक
पताका सहित उठावले ॥१०३८॥

२. नामा पुंडलीक गरुड हनुमंत
परसाभागवत वोलावले ॥१०८०॥

३. नामा पुंडलीक निघाले वाहेरी
गरुडावरी देव स्वार झाले ॥११०४॥

वरील तिन्ही अभंगावरून पुंडलीक नामदेवावरोवरच शेवटपर्यंत उपस्थित होते आणि शेवटी आळंदी सोडताना 'नामा—पुंडलिक' ही जोडी बरोवर होती ही गोष्टहि लक्षात येते.

ज्ञानेश्वरसमाधीशी विसंगत असलेल्या वरील दोन्ही घटना लक्षात घेतल्या म्हणजे 'ज्ञानदेवादि चारी भावंडे समाधिस्थ झाल्यानंतरची ही घटना असावी अशी कै. पांगारकरानी सुचविलेली यावद्दलची संगति आठवते (ज्ञानदेव चरित्र पृ. १५४—५५) खुद्द आळकर्त्याला मात्र ही संगति नीट जुळवता आलेली दिसत नाही.

## 'आळ—कर्त्या'चा कवित्व हेतु

प्रक्षेपाच्या वरील बाह्यखुणाप्रमाणेच आणखी कांही 'आंतरखुणा'हि लक्षात घेण्यासारख्या आहेत.

त्यातील एक महत्वाची खूण म्हणजे 'आळकर्त्याचे कवित्वप्रयोजन हे समाधिप्रकरणातील नामदेवांच्या प्रयोजनाहून भिन्न वाटते. नामदेवांनी ज्ञान-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देवादि चारी भावंडांच्या समाधीचे वर्णन केले असून त्यातील मुख्य मनोगत 'फुटलासे मेळा तापसांचा' हे आहे. ज्ञानदेवादि चारी भावंडे एकामागोमाग लयास गेली हा वृत्तांत पारमार्थिक पद्धतीने सांगताना 'ज्ञानदेवे इच्छिले पोटी। जावे उठाउठी समुदायेसी. (क्रं. १०३७.४) असे त्याचे कारण दाखविले आहे आणि देवाच्याहि तोंडी 'समुदायेसी तुम्हा करूं बोळवण (१९०२-२) असे वचन घातले आहे. समाधीला उपस्थित असलेल्या साऱ्या संतमंडळीचा त्यांनी नांवानी उल्लेख केलेला असून प्रत्येक समाधीची तिथीहि निश्चित सांगितलेली आहे. तेथे जमलेल्या सगळ्या संतमंडळींना मधूनमधून शोकाचा उमाळा कसा दाटून येत होता हे त्यांनी पदोपदी दाखविले असले तरी स्वत: नामदेवांनी त्यांचे कसे समाधान केले त्याचाहि उल्लेख तेथे आलेला आहे. त्या मानाने आळ-कर्त्याच्या अभंगातील पात्रे मर्यादित आहेत, तिथिविषयक अनिश्चितता आहे. संतमेळयाच्या नावाविषयी भलतेच मौन राखलेले आहे आणि घटनेत अथपासून इतिपर्यंत लौकिकापेक्षा अलौकिकाचाच खेळ जास्त आहे.

किंबहुना आळीचे हे आख्यान ज्ञानदेव-नामदेवापुरतेच मर्यादित ठेवण्याचे कर्त्याचे धोरण मंगळाचरण आणि उपसंहार या दोन्ही प्रसंगी स्पष्ट दिसते. मंगलाचरणातील अभंगात कर्त्याने स्पष्टपणे आपला कवित्व हेतु प्रकट केला आहे.

सद्गुरु सखया नाथा पंढरिराया
ठेवी डोई पाया कृपेसाठी
नाही गाठी पुंजी तव कृपेजोगी
झालो हतभागी भक्तीवीण
हतभाग्या कैंची समर्थाची भेटी
घाली घट्ट मिठी संतापायी
भक्तशिरोमणि ज्ञानदेव-नामा
चरित्र महिमा गाऊ त्यांचा
इच्छी मन परि ज्ञानशक्ति क्षीण
धरितो, चरण नाथजींचे ॥१२१९॥

## या कथेचा नायक नामदेवच !

श्री. सुबंध यांनी आपल्या गाथ्यात (नामदेवाचा सार्थ गाथा भाग २ पृ. ३१४) यातील ४ थ्या चरणाचा अर्थ भक्ताग्रण्य ज्ञानदेवराय ज्याचे नाम आहे त्याचे चरित्र माहात्म्य वर्णन करावे' असा केलेला दिसतो. परंतु संपूर्ण प्रकरणाचा ओघ पाहता नामदेवांचे माहात्म्य कर्त्याकडून विशेष गायिलेले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आढळते. श्री. सुबंध यानी 'नामा' याचा नामदेव असा अर्थ केलेला नाही. तसे करू गेल्यास 'हे प्रकरण नामदेवनिर्मित नाही' असे म्हणण्याची जी आपत्ति येते त्याची जाणीव त्यांना झाली असावी काय? ते कांही असो, खुद्द 'आळ-कर्ता' मात्र पदोपदी नामदेवांचे माहात्म्य या प्रकरणात वर्णन करताना आणि त्यातहि रंगून गेलेला दिसतो. उदाहरणार्थ, नामदेवाच्या भाषणानंतर देवाची कशी स्थिति झाली हे सांगताना 'आळकर्ता' प्रसंगाशी तन्मय होऊन गेलेला आहे आणि हा प्रसंग ऐकताना प्रेम उचंबळून येते असा त्याने आपला खास अभिप्रायहि दिलेला आहे; तो पहा:–

नामा हे वदता डोळचा आले पाणी
पडिला धरणी देवापुढे
नामदेव स्थिति पाहून श्रीपति
विस्मित ते चित्ती स्तब्ध झाले
कैशा रीती नाम्या संबोखू मी आता
कठिण अवस्था देव म्हणे
प्रेम उचंवळे ऐकता ही आळ
बुझावी गोपाळ नाम्यालागी (१२२५)

यानंतर जगन्माता रुक्मिणीने 'पुरवा नामयाच्या आर्ति' असे सांगितल्या-नंतरचा हा प्रसंग पाहा:—

देव कळवळले चित्ती । त्यासी मायेची संमति
मायबापांचा त्या लळा । नामा घेईना का आळा
बाप जगताचा स्वामी । आई प्रत्यक्ष लक्ष्मी
नामा थोराचे लेकरू । छंद त्याचा अनिवारू
छंद नाम्याचा पुरविण्या । देव वेची प्रेमनाण्या ॥१२३३॥

या नंतर नामदेवांची भेट झाल्यानंतर ज्ञानदेवांनी नामदेवाविषयी जे प्रेमळ उद्‌गार काढले आहेत ते पाहा.

हरीचिया दासा नामया उदासा
तुझी हृषीकेशा प्रीति बहु
हरिदासामाजी तू होसी आगळा
प्रेमाचा पुतळा नामदेव
ज्ञानदेव म्हणे तू विठोचा लडिवाळ
नामया तू कृपाळ आम्हावरी ॥१२३९॥

( पृष्ठ ३० वर )

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक विद्यमान भक्त कवि

# दास नरहरि

ले.–दे. गो. लांडगे, नागपुर

सामान्यतः नागपुर प्रांतातील ऐतिहासिक घटना व व्यक्ति यांच्या विषयी माझी लेखणी थोडी फार चालते. वाच्यार्थाने शब्द वापरावयाचा झाल्यास मी 'प्रेता' संबधीच लिहीत असतो. आज मी एका जीवित व्यक्ति विषयी लिहावयाचे योजिले आहे. माझ्या मनात ती व्यक्ति ठसली आहे, पण वाचकांस ती कितपत रुचेल हे मला सांगता येत नाही. तरी 'मन:पूतं समाचरेत' या न्यायाने (मराठी भाषेत या म्हणीचा विपरीत अर्थ रूढ आहे.) मी थोडेसे धाडस करीत आहे.

२. स्वामी रामतीर्थांनी मनुष्य जातीच्या स्वभाव धर्माप्रमाणे तिचे दगड, वृक्ष पशु इत्यादि प्रकारांनी वर्गीकरण केले असल्याचे मला आठवते. एका दृष्टीने ते खरे आहे. मला निराळ्या दृष्टीने पहावेसे वाटते. मला मानव समाजाचे त्याच्या वैचारिक पातळीवरून वर्गीकरण करावेसे वाटते. माझ्या मते बहुसंख्य लोक प्रवाहपतितच असतात. निष्ठावन्त असे फार थोडे. त्यापैकी कांही तत्वज्ञ असतात. काही समाजहिताला प्राधान्य देतात, तर कांही स्वत:ची बुद्धि फारशी न चालविता, एखाद्या पूज्य व्यक्तीला आपले सर्वस्व अर्पण करतात. कधी कधी ही निवड चुकल्यामुळे मनुष्याच्या कर्तृत्वाचा अपव्ययहि होतो. उलट कांही असे असतात की, जे दुसऱ्यांना स्वहितार्थ राबवितात. अर्थात् या सर्व निष्ठा परस्पर व्यवच्छेदक नाहीत. एकीचा अंत:प्रवाह दुसरीत न कळत प्रविष्ट झालेला आढळतो. मी या लेखासाठी एका व्यक्तीची निवड केल्या कारणाने वरीलपैकी तिसऱ्या वर्गात माझी गणना कोणी करील अशी भीति वाटते. नाही म्हणावे तर कोणताहि वृत्तपत्राचा अंक उचला. त्यातील बरीच जागा व्यक्ति माहात्म्याने अडविलेली दिसेल. एकाने दुसऱ्याला साहित्यिक म्हणावे तर दुसऱ्याने पहिल्याला सवाई साहित्यिक म्हणावे, असे चालले असते. कांहींचा तर तृतीय पंथच असतो. त्यांना वाटते की दुसऱ्याची कुचेष्टा केल्या शिवाय स्वत:ची प्रतिष्ठाच वाढत नाही' अर्थात् तो प्रयोग पुष्कळदा अंगलटहि येतो. माझी या लेखात विशेष अशी कोणतीच भूमिका नाही हे आरंभीच सांगितलेले बरे.

३ मी एका 'निरुपाधिक' सोज्वळ पण ज्याच्यात ईश्वरनिष्ठेचा भाव अधिक प्रमाणात असून सोबतीला कांही साहित्यिक गणहि आहेत अशा साध्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुख्या व्यक्तीची ओळख करून देणार आहे. येथे 'निरुपाधिक' हा शब्द आध्यात्मिक क्षेत्रातील अर्थविशेषाने वापरला नाही. ज्याला कांही पदवी किंवा उपाधि नाही, किंवा इतर कोणते आकर्षक बीरुद चिकटले नाही, किंवा चिकटवून घेण्याची इच्छाहि नाही, अशा अर्थाने तो उपयोजिला आहे. आमच्या व्यक्तीचे जेमतेम प्राथमिक शिक्षण झाले आहे. मोठ्यात बसल्यामुळे जिभेवर कांही इंग्रजी शब्द नाचतात, एवढीच या गृहस्थाची व्युत्पत्ति. जाति हल्ली कोणी विचारीत नाही व कोणी सांगतहि नाही. तरी जीत एक महान् विभूति जन्माला आल्यामुळे ती पुनीत झाली आहे, अशा जातीत आमच्या वर्ण्य व्यक्तीचा जन्म झाला. ती महान् व्यक्ति म्हणजे संत नामदेवराय ही होय. ज्या योगाने, जेव्हां व जसा स्वार्थ साधेल अशाशी आपले नाते असल्याचे सांगण्याची हल्ली समाजात प्रथा पडली आहे. आमची व्यक्ति त्या प्रवृत्तिपासून सात हात दूर आहे. स्वतः नामदेव महाराज दक्षिणचे पण ते पंजाबात धर्मतत्त्व प्रसारार्थ गेले होते, कारण सबभूमि गोपाल की अशी त्यांची वृत्ति बनली होती. आमच्या व्यक्तीचा पोटाचा धंदाहि नामदेवरायांचाच. गिऱ्हाइकाने दिलेले कापड फाडून त्याला पुनः अंगात फिट बसेल असे करून देणे, हे शिंप्यांचे काम असते. आमचे शिंपी दादाहि ईश्वरदत्त मनः प्रवृत्तीची देणगी आनंदाने स्वीकारून तिला इकडून तिकडून चिंतनाचे टाके मारुन तिला फिट म्हणजे ईश्वर–प्रवण करण्याच्या खटाटोपात नित्य असतात।

४ आमच्या व्यक्तीला जन्मून आज सुमारें ६० वर्षे झाली आहेत. स्वतःचे नांव जरी पुराण वाङ्मयांतर्गत नरहरि (नृसिंह) हे असले तरी वडीलांचे पुंजाजी हे आहे. खरे म्हटले तर किती तरी बहुमोल व्यक्ति केरा पुंजातच लपलेल्या आढळतात. लोकमान्य हे चिखल गावात रुतलेले एक रत्न होते पण ते भारताच्या दैवयोगाने बाहेर आले. हल्ली 'लेवल'चे युग आहे. आमचा हा मानवशांतला कृष्णवर्णीय लोटा पेंद्यात घासलेला, कमरेत किंचित वाकलेला व मुखावर टाचलेला असा आहे. कांही द्रव्याचा मुखलेप असता किंवा रूढ शिक्षणाने भूषविलेला असता तर याच मृदंगाचा ध्वनि कानावर आदळला असता. नाही म्हणावयास नरहरि भातुकली या जैनांच्या प्रसिद्ध ठिकाणी (अमरावती जिल्हा) जन्मास आला व कांही दिवस खुद्द अमरावतीस आपल्या कलाप्रिय वडील भावाच्या संगतीत रमला. पुढे वडील बंधु नागपुरात आल्यावर राजे रघूजी भोसले यांच्या भजन मंडळात असत. परंतु तत्पूर्वी ते अमरावतीस असता राजापुर नाटक मंडळीत पेटी वाजवीत असत. नरहरिच्या समोर सहज रम्य सुखाचे दृश्य असल्यामुळे त्याचे मळलेल्या मार्गाचे शिक्षण दुरावले व त्याला सतारीचा छंद लागला. भेटला एक आडक्याचा गुरु व त्याने विनामूल्य विद्यादान केले. पण ते पोटाचे साधन होणे शक्य नव्हते. म्हणून स्वजातीय



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

धंदाच त्यांनी पत्करला व भर वर्डीच्या सुशिक्षित समाजात आपले वस्तान मांडले. मध्यंतरी दुकानदारीचा अनुभव घेतला. त्यात खोट आली. महात्मा गांधी प्रणीत चळवळीतहि प्रत्यक्षाप्रत्यक्ष भाग घेतला. तो वाणीच्या नर्तनाचा काळ होता. पण जीभ हवी तशी नाचेना म्हणून कापड फाडावे, ते शिवावे व फावल्यावेळी सतारीच्या तारा छेडाव्या किंवा फार तर दोन गती दुसऱ्यास सांगाव्या व कांही कोणी मानाने दिल्यास ते घ्यावे, असा क्रम सुरू झाला. सतार वादनाचे तज्ज्ञ म्हणून विद्यापीठाने कधी कधी नरहरीला पाचारलेहि आहे पण त्यात खऱ्या नाण्याला अवसर थोडा. तेव्हा हे आमचे कलाकार जरा स्वस्थ बसले व आत्म चिंतनाचाच अधिकाधिक आस्वाद घेऊ लागले. मात्र प्रपंच वाढत चालला व त्याचे चटकेहि बसू लागले, तरी वृत्ति ढळू न देता उत्तरोत्तर अंतर्मुख होऊ लागले.

५ बाह्येन्द्रियावर शनैः शनैः ताबा मिळाल्यावर नरहरीच्या अन्तःशक्ति जागृत झाल्या, मनाचा कल संतवाङ्मयाकडे वळू लागला व स्वतःहि कांही करावे, रचावे, असे त्यांस वाटू लागले. 'नहिक्षणमपिजातु तिष्ठत्यकर्मकृत्'चा अनुभव येऊ लागला. त्यांचे लक्ष पारडीचे (हिंगणघाट त.) नगाजी महाराज यांच्या चरित्राकडे गेले. नगाजी न्हावी हे सोनेगावचे आवाजी महाराज यांचे गुरु होत व हे आवाजी कै. जानोजी महाराज भोसले यांचे गुरु होत, एवढे सांगितल्यास पुरे. नरहरीने पांढऱ्यावर काळे करणे सुरु केले व १४ अध्यायात विभागलेल्या १७०० ओव्या लिहून काढल्या. त्याच काळात कै. शंभूराव गाडगीळ यांचेकडे मी यांना प्रथम ओझरते पाहिले. आता नरहरि नुसते नरहरि राहिले नाहीत. ते पद्यकार दासनरहरि झाले. संत चरित्र म्हटले की, ते चमत्कारांनी भरलेले असते. तो भाग वेगळा. कोणी तरी हा चिमुकला ग्रंथ छापणार आहे असे म्हणतात. 'बाळा दुग्धा कोणी केलेसे उत्पत्ति । वाढवी श्रीपति सवे दोन्ही ।' नरहरीनी ओव्या लिहिल्या, छापील कोणी !

६ यानंतर दासनरहरीने आपले लक्ष नामदेव महाराजांच्या चरित्राकडे वळविले व त्याचे २१ अध्याय झाले. ओवी संख्या ३०००. ते १९५८ साली १ वर्षात हाता वेगळे झाले. तेहि कोणी तरी छापावे.

७ आता आपण दासनरहरीला कवि म्हणू या. त्यांना 'कवि'पेक्षा भक्त ही संज्ञाच अधिक आवडेल, असे वाटते. हे सांगणे नको की, या कवीला साहित्य शास्त्राचा गंध नाही. दैनंदिन पोटाचा धंदा अटोपल्यावर ते सायंकाळी हरिपाठाचे आवर्तन करीत असतात. मन भक्तिभावारूढ झाले असता त्यांना जे स्फुरते तेच सूत्र घेऊन ते कागदावर टिपतात व जे टिपतात ते त्यांना पाठहि होते. निवडक माणसाच्या वैठकीत ते म्हणूनहि दाखवितात. मात्र गाजावाज

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करणे त्यांना रुचत नाही. बोत्रावाजीपासून ते दहा हात दूर राहण्याचा प्रयत्न करतात.

८ नामदेवांच्या चरित्रानंतर त्यांनी आणखी एका रचनेत हात घातला. कोणतेहि भक्ति भावाने ओथंबलेले मन श्रीमद्भागवताकडे वळल्या शिवाय राहात नाही. 'विद्यावतां भागवते परीक्षा' याचे आमच्या कवीला कांही कर्तव्य नाही. संस्कृत येत नसल्यामुळे त्यानी एक प्रमाणभूत मराठी भाषान्तर घेतले व दशमस्कंध ओवीबद्ध केला. आमच्या कवीनी कृष्णदयार्णवाचा 'हरिवरदा' वाचला पण तो एकीकडे ठेऊन वरील भाषान्तराचीच कास धरली. दशमस्कंधाच्या ९० अध्यायावर १४ हजार ओव्या लिहून काढल्या. कोणी तरी म्हटले, म्हणून दोन वर्षापूर्वी ब्रह्मविद्या मन्दिरा समोर कांही भाग वाचून दाखविला. एक शब्द अधिक उणा न बोलता कवि त्या ओव्या वाचीत व जेव्हां बंद ठेवा म्हणून सूचना आली तेव्हां ते निमूटपणे बंद करून बाहेर पडले ते पडलेच. वाचन चालू असता कधी फुलाची पाकळीहि घेतली नाही किंवा नंतर कवी प्रस्तावाहि केला नाही. हरिनामाची चिमुकली पेठ त्यांच्याच फाटक्या बैठकीत भरत असते व तेथेच ते आपल्या पुरते मर्यादित देणे घेणे करीत असतात. येथे तोटा होण्याची भीति कमी.

९ हल्ली कवि तुळसीरामायणाचे ओवीबद्ध भाषान्तर करण्यात गुंतलेले दिसतात. त्यांना हिंदी, विशेषतः व्रजभाषा, अवगत आहे. त्यांच्यावर एका वेडसर गुजराथी संताची कृपा दिसते. त्याचे सन्तपण आमचे कवीच जाणोत ! हा गुजराथी गृहस्थ उन्मत्त स्थितीत असतो. कोणाला सतावीत नाही. आमचे कविहि त्याचा देव्हारा माजवीत नाहीत. मात्र त्यांच्या खुणा त्यांना कशा पटतात हे एक गूढच आहे. तूर्त आमच्या कवीनी अरण्य, किष्किन्धा व सुंदर अशी तीन कांडे ग्रथित केली आहेत. आमच्या कवीना गुजराथी व बंगाली भाषाहि अवगत आहेत.

१० दास नरहरीच्या काव्यग्रंथातील ओव्या मोठ्या भावपूर्ण आहेत. त्या उद्धृत करावयाच्या म्हणजे वरीच जागा खर्ची पडेल. त्या मुळातच त्यांच्या हस्तलिखितातून वाचल्या पाहिजेत. परंतु या व्यतिरिक्त जे त्यांचे कवित्व आहे, त्याच्यातील भाव व रस वाचकांच्या प्रत्ययास येईल. म्हणून कांही येथे उतरून घेतले आहेत. कवीची मराठी इतकी हिंदीहि सफाईदार आहे. अर्थात् काव्याचा विषय ईश्वरभक्ति व मुमुक्षत्व.

## मराठी

(१) लावणी

करुनिया सोळा शृंगार चालली व्रिजचे वाटेला ।
अंगि सुगंधी उटणे चर्चुनि चाले व्रिज वाला ॥
नेसली पितांवर जरी,' माठ डोइवरी ऐके ती मुरलीनादाला ।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पायी पैंजण रूणझुण करिती दाविते तालाला ॥
ठेउनी माठ भुइवरी कि जमुना तिरी पाहत सुंदर स्वरूपाला।
नरहरि अन्तरि प्रणाम करतो राधाकृष्णाला ॥

(२) भैरवी– कारे धरिसी पदरा चतुरा नंद कुमारा, गोपि प्रियकरा
कारे धरिसी० ॥
खटनट भारी तूरे मुरारी अडविसि का वाट श्रीहरि
सोडि सोडि पदरा। चतुरा नंद कुमारा ॥ध्रु॥१॥
देई घागर तू रे कृष्णा। पदर पसरूनि विनविते
चरणा । जाऊदे यमुना ॥ चतुरा नंद कुमारा ॥२॥
तव चरणाचा दास नरहरि । एक नजर तु
पाहि पाहि श्रीहरि, येऊ दे करुणा, श्रीधरा।
नंद कुमारा गोपि प्रियकरा ॥३॥

## प्रार्थना

देवाधिदेवा जगत्पति। अखिल विश्वाची प्राण ज्योती। ऐशा हाकारिती श्रुती । गानरूपे तुजलागी ॥१॥ निर्गुण निराकार। परी असती जगदाधार। सगुण रूपे अवतार। घेसी भक्त रक्षण्या ॥२॥ दुष्ट गांजिती सज्जनांसी। ते शरण येती तुजसी। रक्षण्या तू अवतरसी। अनेक रूपांनी ॥३॥ ऐसे तुझे अवतार साचे। अनेक जहाले भाग्याचे। ते कवणासही वाचे। वर्णवेना दयाळा॥४॥ अपरंपार तुझी करणी । नयेती कवणा ध्यानी । तूच एक त्रिभुवनी। चालक सर्व सूत्रांचा ॥५॥ तूचि आदि देवता। तूचि असे जगत्कर्ता। तूचि पिता, तूचि माता । तूचि मूर्ति सद्‌गुरूची ॥६॥ तुझेविण ठाव रिता। कोठेही नसे भगवंता। तुझे आज्ञे वीण याजगता। काहीच होईना ॥७॥ नामे तुझी अनंत। नसे त्या नामांचा अंत। म्हणोनीच तुजसी अनंत। म्हणती कीरे दातारा ॥८॥ अनंत नाम येकेरी। परी ते अनंतांचे कैवारी। जे तारण्या भवसागरी। असे श्रीहरी समर्थ ॥९॥ परी श्रीकृष्ण नाम गोड। त्याचीच असे मज ओढ। येवढेच पुरवी कोड। या वाचे ठसविण्यांचे ॥१०॥ तेच या हृदय मंदिरी। ठसूदेई श्रीहरी। जेणे अष्टौप्रहरी। हरे कृष्ण यावेरे ॥११॥ ऐसे करी भगवंता। खाता, पिता, हिंडता। कृष्ण नामाचा या चित्ता। विसर तो नपडावा ॥१२॥ निद्रित मी असतांना। स्वप्नी येउदे त्याच कल्पना। अगम्य तुझ्या लीला नाना। स्वप्न सृष्टीत पहाव्या ॥१३॥ अखंड तुझे ध्यान। लागो कृष्ण हरे कृष्ण। आणिक दयाळा-हे मन। न जावो अंन्यस्थळी ॥१४॥ जरी गेले अन्यस्थळी। तेथे तूची दिसावा वनमाळी। म्हणजे या जिवात्ये वेळी। नयेती विकल्प ॥१५॥ कल्प विकल्पांतरी। तूची दिसावाश्रीहरी। ऐसा हा दास नरहरी। चरणी करी प्रार्थना ॥१६॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(४) बहुत मी केला नेटका प्रपंच । धरूनिया आस सुखाचीया । रात्रंदिन काम वस्त्रांते शिवणे । प्रपंचा कारणे हेचि मना । वयमाने करुन होत नाही काज । प्रपंचाचा बोज वाढतसे । वाढियल्या कन्या फिरतो समाजी । परी ठाव कोठे दिसेनाचि । जावे तीर्थांतरी पैका नाही पासी । तेणेही त्रिपुटी होई मन । ऐकावे पुराण वाचावे ते ग्रंथ । त्यांतहि मन लागेचीना । ऐकेनाती मुले काढीताति डोळे । करिवी सोहळे बोल बोलो । सांगे नरहरि अंतरीची मात । परि नाही देत दोष कोणा.

(५) हीन माझी जाती बळ नसे अंगी । व्यवहारी बुद्धी तीहीनसे । सांगाहो विठ्ठला काय मी करावे । कैसे रहाटावे जगा माजी । बहुतचि पायी तुम्ही उद्धरिले । आम्हासचि काहो उपेक्षितां । जगामधे नाही कोठेची ओलावा । म्हणोनी केशवा पायी आलो । नरहरि सांगे अंतरीचे गूज । हेतु, केशव राजा, जाणतोची.

## हिंदी

१ प्रभु चरणन को प्यासा । मैं तो प्रभुचरणन को प्यासा ॥ध्रु॥
प्रभु चरणन बिन कछु न सुहावे । मन मो रहत उदासा ।इस मायासे पार करावो नाही कछुकी आसा ॥प्रभु॥ १॥ भव सागर सो पार करावै । ऐसो को ऊजनन वतावै । यहि विधि कोऊ राह दिखावै । मन मो होइ प्रकाशा । नरहरि चितको डर लागत हैं कौन कि करूजी आसा ॥२॥

२

जाग जागरे भाई । अरे मन जागरे माई ॥ध्रु॥
बीतो जाये यौवन तोरा । अंती कछुना होई । अरे मन ॥१॥

लख चौरासी गिरकी लेके सुंदर नर तनु पायी । अवहि तो भजले रामनाम तु, काया अमर होई ॥२॥ तनका पंची कब उड जावे जाने न अवलग कोई । माटीके संग माटि मिली हैं । कौन गति तोरि होई ॥३॥ काहु कि दौलत माल खजाना । काहु कि लोग लुगाई, नरहरि जागो राम नाम सो । फिर ये जलम न होई ॥३॥

३

मन्द मन्द समीर चले सुगंध छुटे व्रज फूलनको लयि मटका चली है मदमाही । दधि को लइ असमखनको । सखियन संग लै राह चलै । कछु सोच विचार करै मन माही । दधि वेचके जाय मधु वनको । उत कान्ह रहैं लै गव्वन को दिल होत सखी खेलै होरी । लै रंग गुलाल पिचकारिनको । लाल कि कछूनी लाल करू । अस डालवु रंग गुलालनको । भांत भात के फूल लऊ । कुछ हार करै । गला डालनको फिर बिनती करै मुरली धर की । लइ बान्स को करू.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गानको । नरहरि भनक परी मुरलीकी । पगनूपुर वांव दं तालन को । सव गोप गोपि मिल रासरची । धन धन भाग व्रज के गोपन को ।

४

(एक तरूणी एका तरूणास पाहून वेडी होई हे पाहून)

मन्दर सो निकरी दौर दौर देखनको । चित चोर जनु प्यासे भये, समारे न कटी चीर देखने गिरधारीको ॥ ऐसी चली व्रज नार, ठाडो जहा मुरलीवर बजावनं मुरलीको ॥ सिरकी लट समीरसे; खेल रही कुचहुसे और बिखरी भुजाओंसे, नही ध्यान उसको । कहे दास नरहरि ऐसी चली, दौर दौर, ठाडो जहा मुरलीधर, निहारन वो छविको ॥

११ आता लेखकाचा व कवीचा जो अलीकडे स्नेहसंवंध जुळला, त्या विषयी दोन शब्द लिहितो. पहिली गोष्ट ही की, त्यांच्याशी वार्तालाप करीत असता लेखकाच्या मनाला अकृत्रिम आनंद होतो. त्या आनंदाची सर एखाद्या वहुश्रुत विद्वानाशीहि वोलत असता येत नाही, हे नम्रपणे नमूद करावेसे वाटते. पाहिजे असल्यास दोन्ही मने भावडी आहेत, असे वाचकांनी म्हणावे. आमच्या या व्यक्तीच्या तोंडी कोठे जाडे पारिभाषिक शब्द दिसणार नाहीत, कारण विचाऱ्याचे ग्रान्थिक शिक्षणच झाले नाही. परंतु त्यांच्या वैठ्या वक्तव्यात जे जगाचे मूल्यमापन असते किंवा आत्मानुभवाच्या ज्या खुणा विखुरलेल्या दिसतात त्यामुळे या संघर्षमय जगात सांपडलेल्या आमच्या सारख्या सामान्य माणसास वरेच उपयुक्त खाद्य मिळते. या गृहस्याला रूढ शिक्षण तर नाहीच, पण एवढ्याहि पुंजीवर ज्यानी धनार्जन केले आहे अशातहि त्यांची गणना होत नाही. किंबहुना असलेच कांही पदरी तर दारिद्रय मात्र आहे. त्यांची बुद्धि विश्लेपणा-त्मक व सारग्राही असल्याने त्यांचे सांसारिक आडाखेहि विनचूक असतात. उगाच उठल्या सुटल्या देवदेवळे किंवा साधुसंत यांचे पायी डोई झिजवायची त्याना सवय नाही. बोवावाजीपासून तर ते शंभर पावले दूर असतात व विद्वानांच्या पोपट पंचीकडेहि त्यांचे दुर्लक्ष असते. या ऐवजी ते 'येता जाता वसता उठतां' ईश्वर नाम जिव्हेने उच्चारीत असतात. प्रपंचातहि त्यांची वुद्धि अशीच अनासक्त रीतीने काम करीत असते. सर्व व्यवहार व्यवहारी पद्धतीनेच तें करतात, परंतु परम केन्द्र विंदु ते सहसा ढळू देत नाहीत. त्यांची राजकारणी मतेहि स्पष्ट व निर्भीड असतात त्याना निरंतर समाज सन्मार्गाने चालावा याचा ध्यास लागला असतो, तसेंच संत महात्मे यांनी निर्मिलेली उदार भारतीय संस्कृति टिकून राहावी असे त्यांस मनापासून वाटते. त्यासांठी इतर कोणास शरण न जाता परमात्म्याशीच हितगुज करावे अशी त्यांची धारणा आहे. आचरणात कोणताहि दांभिकपणा दिसू नये याची ते कटाक्षाने काळजी घेतात. दारिद्रय मिटावे म्हणन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोणा श्रीमंताकडे किंवा अधिकाऱ्याकडे ते याचना बुद्धीने जात नाहीत. जे प्रेमाने बोलतील त्यांना प्रेमाचीच प्रतिसाद ते देतात. जे मिळेल ते कुटुंबास सर्वस्वी अर्पण करून स्वत: तटस्थ वृत्तीने राहतात.

१२ आमच्या अल्पबुद्धीला असे वाटते की श्री: दास नरहरीच्या संगतीत फावल्या वेळी कोणी जाऊन बसल्यास त्याचा वेळ वाया जाणार नाही. अशी तुरळक पण निवडक मंडळी त्यांचे कडे येतहि असते किंवा तेहि तशा मंडळीकडे स्वत:हून जातात. मला व्यक्तिश: प्रथितयश पंडितमन्या पेक्षा अशाच अल्पज्ञात व्यक्ति आवडतात. हा माझा न्यूनगंड असेल पण असे आहे हे खरे.

## नामदेवाच्या गाथ्यातील एक प्रक्षिप्त प्रकरण–

( पृष्ठ २२ वरून )

एकंदरीत ज्ञानदेव–नामदेव यांची विठ्ठलाने घडवून दिलेली भेट हा या प्रकरणाचा विषय असला तरी 'नामदेवांचा शोक (क्र, १२२०) नामदेवांची कठिण अवस्था (१२२५) पुरवा नामयाच्या आर्ता म्हणून जगन्माता रुक्मिणीची सूचना (क्र. १३३२) आणि ज्ञानदेवांच्या मुखाने नामदेवाच्या प्रेमळपणाचे केलेले गौरव (क्र. १२३९) हे सारे प्रकरणातील मुख्य टप्पे नामदेवावरच कर्त्याचे लक्ष केंद्रित असल्याचे सुचवितात. किंबहुना मघून मघून 'प्रेम उचंबळे ऐकता ही आळ' (क्र. १२२५) नामा थोराचे लेकरू छंद त्याचा अनिवारू (क्र. १२३३) ही कर्त्याने केलेली निवेदने पाहिली म्हणजे ही कथा नामदेवांच्या महात्म्याची आहे आणि या प्रकरणात रंगविलेल्या कथेचा प्रमुख नायक 'संतश्रेष्ठ नामदेव' हेच आहेत हे उमगल्याशिवाय राहत नाही.

### अंत:प्रवृत्तीची दखल घ्यावी

आणि मग येथेच आपल्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न उपस्थित होतो तो असा की आपल्या प्रेमळपणाची थोरवी सांगणारी ही कथा नामदेवाच्या वाणीतून प्रगट होणे संभवनीय आहे काय ? नामदेवांच्या अंतरंगाकडे पाहावे तर 'संतचरणीचे रजरेणु' म्हणवून घेण्याइतके ते सावध आहेत. अशा नम्र, अहंकार विवर्जित आणि सात्विक वृत्तीच्या नामदेवांनी आपल्या गौरवाची गाथा इतक्या नि:शंकपणे गाणे कधीतरी शक्य आहे काय'. 'ही आळ नामदेवाची आहे' असे म्हणणाऱ्यानी नामदेवांच्या स्वभावातील या 'अहंकारविवर्जित'तेची तरी दखल घ्यायलाच हवी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# परिचय–परामर्श

## रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र

संपादक––श्रीपाद जोशी

प्रकाशक––जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे २

मूल्य चार रूपये

महाराष्ट्र राज्य रवींद्रनाथ–जन्म शताब्दि समितीच्या वतीने 'रवींद्र आणि महाराष्ट्र' ह्रा ग्रंथ प्रकाशित करण्यात आला आहे.

रवींद्रनाथांचा महाराष्ट्राशी बराच संबंध आला. त्यांच्या साहित्याची व प्रतिभेची कदर करणारी बंगाल बाहेरील पहिली व्यक्ति महाराष्ट्रीय तरूणी होती. अन्नपूर्णा तर्खडखर हे तिचे नाव. रवींद्राच्या हृदयातील काव्य फुलविण्याचे बरेच श्रेय तिच्याकडे जाते. तिनेच रवींद्रांना इंग्रजी भाषेचे व रीतिरिवाजांचे धडे दिले. त्यावेळी रवींद्र केवळ सतरा वर्षांचे होते. त्यांची कविता केवळ उमलू पाहात होती. पण तरीहि अन्नाला अस्फुट उषेच्या प्रभेत मध्यान्हीच्या सूर्याचे दर्शन घडू शकले. ही महाराष्ट्रीय अन्ना रवींद्रांच्या काव्य साधनेतील महत्वाची प्रेरणा मानली जाते. मधल्या दादांचा (सत्येंद्रनाथ ठाकूर) नोकरीच्या नात्याने महाराष्ट्राशी विशेष घनिष्ट संबंध होता. त्यामुळेच रवींद्रांना महाराष्ट्राचे दर्शन आणि सहवास यांचा लाभ झाला. त्यांच्या काव्यकोमल मनावर महाराष्ट्राची अनेक वैशिष्टचे संस्कारित झाली. शिवाजी–टिळक व तुकाराम–रामदास यांच्या चारित्र्याने रवींद्रांचे कविहृदय पुलकित झाले. त्यांच्या प्रतिभेला इतिहासाच्या अस्सलतेचे दर्शन घडले. जिवनातील उज्ज्वलता त्यांच्या प्रतिभेला जाणवली. म्हणूनच ॲकवर्थ साहेबांचे Ballads of Marathas (मराठ्यांची संग्राम–गीते) वाचून त्यांचे कवित्व बहरले. 'सती', विचारक' 'प्रतिनिधि' ह्या कविता याची साक्ष पटवितात.

रवींद्रांचे महाराष्ट्र–संबंध असे गाढ आहेत. महाराष्ट्र त्यांच्या अंतःकरणात खोलवर शिरलेला आहे. त्यामुळे त्यांच्या वाङमयात महाराष्ट्रप्रेमाची चित्रे कित्येक ठिकाणी विखुरलेली दिसतात. ती श्रीपाद जोशी यांनी प्रस्तुत ग्रंथात परिश्रमपूर्वक संकलित व संपादित केली आहेत. स्वाभाविकच या ग्रंथातून रवींद्रांच्या महाराष्ट्रीय प्रेमाचे मनोज्ञ दर्शन घडते. सध्याच्या भावनिक एकात्मतेच्या युगात ह्रा प्रयत्न विशेष औचित्यपूर्वक वाटतो. एका जागतिक श्रेष्ठतेच्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भारतीय महाकवीला महाराष्ट्राविषयी वाटणारे आपलेपण आपल्यालाहि गहिवरुन आणते. या महाकवीच्या मनातील 'आत्मचित्र' पाहून आपले मन भरुन येते.

शिवाजी हे महाराष्ट्राचे स्फूर्ति-दैवत. पण शिवबाच्या पराक्रमस्पर्शाने या कविश्रेष्ठाची प्रतिभा पालवली. तेव्हाच 'शिवाजि-उत्सव' सारखी भव्य, स्फूर्तीदायक व अद्वितीय कविता उतरली. तिच्यातील उत्कट व उत्तुंग असे गौरवोद्‌गार आपल्याला मोहित करुन टाकणारे आहेत. "शिवाजी ओ गुरु गोविंदसिंह" हा कविवर्यांचा लेख या संदर्भात विशेष उल्लेखनीय वाटतो. शिवाजीमहाराजांविषयीचा जाज्वल्य अभिमान उचित मूल्यमापनासहित त्यांनी या निबंधात मांडला आहे. विचाराची विशालता व व्यापकता व्यक्त करणाऱ्या या निबंधात ते लिहितात, "शिवाजीमहाराजांनी ज्या काही लढाया केल्या, त्या एखाद्या सोपान-परंपरेप्रमाणे सूत्रबद्ध होत्या; त्या रागारागानें केलेल्या नुसत्या हाणामाऱ्या नव्हत्या. सबंध भारतवर्षाला आणि दूरपर्यंतच्या काळांला नजरेसमोर ठेवून त्यांनी एक महान् ध्येय निश्चित केले होते. त्यांत खूप क्रमबद्धता होती. ती कांही एखाद्या सांप्रदायिक प्रक्षोभाची अभिव्यक्ति नव्हती; तर एक फार मोठे उद्दिष्ट साध्य करण्याचा तो प्रयत्न होता" (पृष्ट–९३) शिवाजीमहाराजांच्या ध्येयस्वप्नाचे काढलेले हे वास्तव चित्र पाहून कोणाला अभिमान वाटणार नाही?

गुरुदेव टागोरांनी या स्वप्नाच्या सामर्थ्यासोबत त्याच्या सीमाहि मोठ्या चातुर्याने सूचित केल्या आहेत. त्या कटू असल्या तरी अतार्किक नाहीत. त्यांची शिवाजीविषयीची श्रद्धा डोळस होती. ते म्हणतात, "शिवाजीमहाराजांचे हृदय सबंध देशातील लोकांशी स्वतःला जोडू शकले नाही. त्यामुळे त्यांचा उद्देश काहीहि असला तरी त्यांचा प्रयत्न हा साऱ्या देशाचा प्रयत्न होऊ शकला नाही. आणि मराठ्यांनी सुरू केलेला हा उपक्रम परिणामी भारतातील इतर जमातींच्या बाबतीत लुटारूंचा भयंकर उपद्रव बनला." (पृष्ठ–९३) शिवाजी महाराजांविषयी किंचित्‌हि अनादर न बाळगता केलेले हे विश्लेषण कित्येकांना कटू वाटण्याचा संभव असला तरी मार्मिक आहे हे मान्य केले पाहिजे. याच लेखात टागोर पुढे लिहितात, "जी भावना शिवाजी महाराजांच्या मनात विशुद्ध स्वरूपात होती ती पेशव्यामध्ये हळूहळू वैयक्तिक स्वार्थाने कलंकित होत गेली. ती भावना देशातील सर्वसामान्य लोकांच्या अंतःकरणापर्यंत पोचली असती, तर कदाचित् ही विकृति निर्माण झाली नसती. तसे झाले असते म्हणजे एका महान् भावनेला महान् आधाराच्या वळावर स्वतःचे स्थान आणि खाद्य मिळाले असते." (पृष्ठ–९३) हे सारेच विवेचन एक प्रकारच्या अलिप्त आत्मीयतेने केलेले असल्याने ते मार्मिक झाले आहे.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लोकमान्य टिळक, रामशास्त्री प्रभुणे (विचारक) तुकाराम, रामदास, मुंबई शहर, कारवार, पंडिता रमाबाई आदि कितीतरी विषयांच्या निमित्ताने टागोरांनी आपल्या महाराष्ट्र–स्नेहाचा आविष्कार वाङ्मयातून केलेला आहे. त्यांच्या वाङ्मयसागरात इतस्ततः विखुरलेल्या या आविष्कारांचे संकलन व संपादन श्री श्रीपाद जोशी यांनी कौशल्याने केले आहे. या संकलनातून रवींद्रनाथ व महाराष्ट्र यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते सुव्यक्त होते. ते हृद्य वाटते.

अनुवाद सरस आणि प्रवाही उतरला आहे. त्यामुळे समग्र संकलन एकसंघ वाटते. त्यातील तुटकपणा तीव्रपणे खटखत नाही. मूळ बंगाली लिखाण दिले असल्याने प्रत्यक्ष टागोरांनी वापरलेले शब्द पाहण्याची संधि वाचकांना गवसते क्वचित् प्रसंगी मूळ आणि अनुवाद यांची तुलना करण्याचा मोह होत असला तरी तो मुद्दा गौण आहे. टागोरांचे मूळ वचन वाचायला मिळणे यातील समाधान काही वेगळेच आहे.

एका समुचित आणि उपयुक्त ग्रंथाच्या निर्मितीबद्दल श्री. श्रीपाद जोशी आणि रवींद्रनाथ–जन्म शताब्दि समितीचे पदाधिकारी यांना हार्दिक धन्यवाद.

–रू. पां. पाजणकर

---

## प्रतिबिंब

(प्रतिबिंब–काव्यसंग्रह. कवि–स. रा. माहुलकर
प्रकाशक–स. रा. माहुलकर, सुमंगल वस्त्र भांडार,
वाकररोड, मातागल्ली, नागपूर २.
पृष्ठे ९६. मुल्य २=५०

नागपूरच्या श्री. स. रा. माहुलकरांच्या सत्तर कवितांचा हा संग्रह आहे. संग्रहाचे प्रकाशन मार्च ६४ मधील असले तरी त्यातील कवितांचे वळण मात्र आधुनिक नाही; ते जुनेच आहे. अर्थात्, नवकवितांच्या ह्या काळात श्री माहुलकरांच्या कवितांचे दर्शन घडले म्हणजे आधुनिक वेषभूषेच्या साधनसामुग्रीने समृद्ध असलेल्या...आपल्या पदन्यास करीत मार्गक्रमण करणाऱ्या युवतींच्या मेळाव्यात जुन्या पद्धतीने नऊवारी लुगडे नेसून देवळात सांजवात नेण्यासाठी मंद पावले टाकीत जाणाऱ्या गृहिणीची आठवण कुणालाही होईल! –श्री. माहुलकरांची कविता प्रामुख्याने 'स्वान्तः–सुखाय' असल्याने आपल्या मनातील विचारभावनांचा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अकृत्रिम रीतीने आविष्कार करण्याशिवाय अन्य प्रयोजनाचा त्यांनी विचार केलाच नाही व म्हणून आजच्या काव्यवाचकाला त्यांची कविता 'जुनी' वाटली तर त्यात आश्चर्यहि नाही.

श्री. माहूलकरांची कविता जुनी तसाच त्यांचा वाचकवर्गहि जुनाच आहे. आणि स्वतः माहुलकरांनाहि जुन्याचे वेड आहे. 'जुनं ते सोनं' (पृ. ८२) असे त्यांचे मत असल्यानेच आधुनिकतेतील सदोष गोष्टींवर ते खुशाल प्रहार करतात! —आजच्या जगात खोट्या मूल्यांचा वृजवुजाट झाल्याने ते त्यांना टीकास्पद वाटते. अशा वेळी त्यांच्यातील उपहासवृत्ति मोठ्या कुशलतेने प्रगट होते.

डोईवरचा पदर
आता चाल जुनी झाली
इश्श नको खांद्यावर
तऱ्हा खाली उतरली. (पृ. ८३).

जुन्या व नव्या जगाच्या या तुलनेने त्यांच्या विनोदवृत्तीला खाद्य मिळते व नव्याच्या उपहासाबरोबरच जुन्याचा अभिमान जागृत होतो. जुनी परंपरा, रूढी, आचारविचार यावर त्यांची श्रद्धा आहे. जीवनाचे चटके स्वतः कवीने सहन केलेले असूनहि जीवनाविषयीचे कडवट उद्‌गार ह्या संग्रहात आढळत नाहीत, हे विशेष. किंबहुना; 'सदा मनी समाधान। सुखाचाही हाच सार' अशीच त्यांची दृष्टी आहे. 'कलीचे नकली युग' (पृ. १२) नल–दम् अन् शिव्या खाणं (पृ. १४) सांसूं (पृ. ५६) दंतारिष्ट (५०), – स्वल्पाहार (पृ. ४८), खरूणासव (पृ. ४५) इत्यादि त्यांच्या कवितांचा जन्म मानवी जीवनातील हास्यास्पद विसंगतीच्या आविष्कारवृत्तीतून होतो.

श्री. माहुलकरांच्या कवितेतील ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भक्तिकाव्ये आणि गीते. पदात्मक रचना करण्याची त्यांना विशेष आवड दिसते व ती दत्त-दर्शन (पृ. १), प्रतिबिंब (पृ. २) भ्रमनिरसन (पृ. ५) इत्यादि कवितातून प्रगट होते. दत्त हे त्यांचे आराध्यदैवत. त्या दैवताविषयीचा भक्तिभाव प्रगट करणाऱ्या कविताहि या संग्रहात आहेत. भाविकता, प्रांजळपणा, परंपराभिमान इत्यादि वैशिष्ट्यांबरोबरच कवीचा कोटीबाजपणा, विनोदवृत्ति आणि निवेदनाचे सुबोधपण या संग्रहातून प्रगट होतात व एका प्रामाणिक अंतःकरणाचे साधे काव्य वाचून मनाला आनंद होतो. संग्रहाला प्राचार्य दि. वि. वराडपांडे व प्रा. सावळा-पूरकर यांचे मार्मिक प्रास्ताविक जोडले असून श्री. माहुलकरांच्या काव्यसंग्रहाचा त्यातून सहानुभूतीने परिचय घडवून दिलेला आहे. कै. उपाध्ये किंवा बोवडे यांच्या काव्याची काही प्रमाणात आठवण करून देणारा हा संग्रह विशिष्ट रसि-कांना वाचावासा वाटेल, यात संदेह नाही.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

## जिव्हाळी—

कवि गुणाकर देशपांडे
शिरीष प्रकाशन, धरमपेठ. नागपूर १.
पृ. ६३. मूल्य अडीच रुपये.

श्री. गुणाकर देशपांडे ह्यांचा कवि म्हणून नव्याने परिचय करून देण्याचे काही कारण नाही. गेल्या एका तपापासून ते काव्य लेखन करीत आहेत आणि जाणत्या रसिकांच्या मनाला हलवून जाईल असे ते काव्यलेखन आहे, याचा सगळ्यांनाच प्रत्यय आहे. मात्र अशा अधूनमधून वाचलेल्या सुंदर कविता एकत्र वाचण्याची संधी या प्रकाशनाच्या निमित्ताने वाचकांना मिळाल्यामुळे कवीच्या अनुभूतींचा एकत्रित आस्वाद घेण्याची सोय झाली, इतकेच !

श्री. देशपांडे ह्यांचा संग्रह वाचताना सर्वांत महत्त्वाचा विशेष मला जाणवला तो त्यांच्या अभिव्यक्तिसामर्थ्याचा ! मनातील तरल भावना मोजक्या शब्दांच्या माध्यमात ते अशा कुशलतेने गुंफतात की मन हरखून जाते—

स्वप्नांच्या छायेत अशी
नको बेसावध फिरू
लागतील आपसूक
तुझे नयन पाझरू (नको. पृ. ३)

किंवा—

अशी घातलीस आण
मन झाले पाणी पाणी
जीभ कापुनिया केली
काळजाची मुकी वाणी (आण. पृ. ११);

किंवा—

नको अशी थट्टा करू
सये ! अंतर तुटते
शीर काढता काढता
पान कोवळे फाटते (थट्टा. पृ. ३३)

यासारख्या ओळी वाचताच एका वेगळ्याच भावनांचा स्पर्श मनाला होतो आणि त्या ओळी ओठावर घुटमळत राहतात.

श्री. गुणाकर देशपांडे ह्यांच्या वृत्ती निसर्गसानिध्यात अधिक फुलारून येतात. निसर्गातील विविध रंगछटांचे त्यांना आकर्षण वाटते. निळी सावली



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(पृ. २१). सकाळ श्रावणातली (पृ. २९) इत्यादि कविता त्याची साक्ष देतात. सकाळ श्रावणातली मधले सकाळचे चित्रण म्हणजे निसर्गचित्र (landscape) वाटते. इतका जिवंत रेखीवपणा ह्या काव्यात आहे. नवीन प्रतिमांची निर्मिती कवितांना वेगळेच सौंदर्य चढवितांना दिसते. त्यांच्या कवितेतील अंधार हात उचलतो व काकड थंडीमध्ये कोवळे ऊन शहारू लागते. (विरहिणी–पृ. ५५).

'जिव्हाळी' या अर्थाला प्रामाणिक असणाऱ्या अनेक कविता इथे आढळतात व कविमनाचे दुःख त्यातून प्रगट होते. हे दुःख प्रीतीतूनहि निर्माण होते, तसेच आकांक्षांच्या अतृप्तीतूनहि होते. –ध्यास ज्याचा अंतराला । तेच मी पकडू शकेना' (मी शकेना–पृ. ८) हे दुःखाचे कारण. हे दुःख अधिक गडद रंगात प्रकट होते ते अमूर्त (पृ. १२) व त्यापेक्षाहि 'पाखरू' या कवितातून. जीवनाची वाटचाल करताना आलेले सारे कडवट–गोड अनुभव श्री. देशपांडे ह्यांनी साकार् केले, ते 'पाखरू' या कवितेतून ! – मानवजातीच्या प्रवासानुभवाचाच तो आविष्कार वाटावा, इतके प्रातिनिधिक असे ते चित्रण आहे व छंदमुक्त अशा लयबद्ध गद्य-पद्धतीने ते मांडले असल्याने विलक्षण परिणामकारक झाले आहे. जीवनातील नानाविध बऱ्यावाईट अनुभवांचा हा शब्दात्मक आविष्कार पहा–

कधी गेलो फुफाटचातून पंख पोळून करपून गेले
कधी गेलो काटच्यांमधून अंग सारे रक्ताळले
कधी गेलो ढगांमधून चांदण्यातून पोहत पोहत
कधी निळ्या आंबराईत झोपी गेलो गीत ऐकत...

छंदमुक्त लयबद्ध अभिव्यक्तीचा प्रयत्न 'इथेच रहा', 'प्रतीक्षा', 'प्रश्न', 'अचानक' इ. कवितांतूनहि करण्यात आलेला आहे आणि तो प्रभावी आहे. भावनांच्या उत्कटतेतील 'तरतम' अवस्थेला पकडू शकणारी ही लवचिक अभि-व्यक्ति परिणामकारक वाटते; व म्हणूनच की काय एकंदर संपूर्णच कविता आपला ठसा मनावर उमटून जाते. कै. कुसुमावतीबाई देशपांडे ह्यांनी 'गुणवती' ह्या एकाच शब्दात त्यांच्या काव्याचे योग्य मूल्यमापन केले आहे. मनातील तरल भावनेचा सूचक आविष्कार करण्यात श्री. गुणाकर देशपांडे हे अत्यंत यशस्वी झालेले आहेत व त्यामुळेच त्यांचे काव्य अविस्मरणीय नव्हे, तर नित्यस्मरणीय असे झाले आहे ! –

व. कृ. व.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# संघवार्ता

प्रा. श्री. गो. काशीकर

सरचिटणीस वि. सा. संघ

यांजकडून

## कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला

दरवर्षीप्रमाणे यंदा कै. ना. के. बेहेरे यांच्या जन्मदिनी, दि. ४ जुलै ६४ रोजी न्या. मू. वि. म. नाईक मुंबई यांचे 'स्वातंत्र्य–अर्थ व व्याप्ति' ह्या विषयावर भाषण झाले.

## महाकवि कालिदास स्मृतिदिन

आषाढ शुद्ध प्रतिपदा शुक्रवार दि. १० जुलै ६४ रोजी महाकवि कालिदास स्मृतिदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्कृतचे पंडित श्री. श्री. भि. वेलणकर पी. एम्. जी. नागपूर यांचे "आजच्या रंगभूमीवर अभिज्ञान शाकुन्तलम्" ह्या विषयावर भाषण झाले.

## व्यास पौर्णिमा

व्यासपौर्णिमेनिमित्त दि २५ जुलै ६४ रोजी प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे "भगवान् व्यास आणि त्यांचे कार्य" ह्या विषयावर भाषण झाले.

## लो. टिळक जयंती

लो. टिळक जयंतीनिमित्त दि. ३० जुलै ६४ रोजी प्रा. श्री. भा. वर्णेकर यांचे "लोकमान्य टिळकांची स्वत्वनिष्ठा" ह्या विषयावर भाषण झाले.

## साधारण सभेतील दुखवट्याचे ठराव

श्रीमंत दादासाहेब धनवटे यांच्या दुःखद निधनानिमित्त वि. सा. संघाच्या दि. २६ जुलै ६४ रोजी झालेल्या वार्षिक सर्व साधारण सभेत दुखवट्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

अध्यक्षस्थानी श्री. आ. रा. देशपांडे होते. त्यांनी सुरुवातीला कै. दादासाहेब धनवटे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केल्यावर श्री. ना. रा. शेंडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यांनी आपल्या भाषणात कै. दादासाहेबांच्या चित्रकलेसंबंधी, आजपर्यंतच्या सामाजिक कार्याबद्दल आणि दातृत्वाबद्दल गौरवपूर्ण उद्‌गार काढले तदनंतर कार्यकारी विश्वस्त न्या. मू. श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांनी भाषण करून घनवटे रंगमंदिरास कै. दादासाहेबांनी उदार देणगी देऊन नागपुरात एक भव्य वास्तु निर्माण करण्यास साह्य केले, तसेच निरनिराळ्या संस्थांनाहि त्यांनी उदार देणग्या देऊन उपकृत केले, त्यासंबंधी काही आठवणी सांगितल्या आणि कै. दादासाहेबांच्या दातृत्वाचा गौरव केला.

यानंतर सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी पुढीलप्रमाणे ठराव वाचून दाखविला.

## ठराव

"विदर्भ साहित्य संघाचे एक प्रमुख दाते व हितचिंतक श्रीमंत दादासाहेब घनवटे यांच्या निधनाने विदर्भ साहित्य संघाला अत्यंत दुःख होत आहे. स्वतःच्या कर्तृत्वाने सामान्य परिस्थितीतून वर येऊन एक असामान्य दर्जाचे उद्योगपति म्हणून त्यांनी यश मिळविले. अनेक सार्वजनिक संस्थाना व कार्यकर्त्यांना उदारपणे मदत करून त्यांनी आपल्या दातृत्वशीलतेचा परिचय करून दिला. विदर्भ साहित्य संघाबद्दल त्यांना अगदी सुरुवातीपासूनच अत्यंत आत्मीयता वाटत होती. त्यांच्या साह्यामुळेच घनवटे रंगमंदिराची वास्तु अल्पावधीमध्ये साकार होऊ शकली. श्रीमंत दादासाहेबांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

परमेश्वर दिवंगताचे आत्म्यास सद्‌गति देवो."

नंतर सर्व सभासदांनी उभे राहून मूक श्रद्धांजली अर्पण केली. याचवेळी भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानिमित्त दुखवट्याचा ठराव वाचून दाखविण्यात आला. सर्व सभासदांनी उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

तसेच विदर्भातील श्री गुलाबराव महाराजप्रणीत श्री ज्ञानेश्वर सांप्रदायातील प्रमुख भक्तिमार्गी सत्पुरुष आणि वेदान्ती श्री बाबाजीमहाराज पंडित, वि. सा. संघाच्या प्रारंभिक अवस्थेत संघाचे संस्मरणीय कार्य केलेले श्री. शं. ना. ऊर्फ काकासाहेब सहस्रबुद्धे, खामगाव शाखेचे कार्यकर्ते व घडाडीचे तरुण लेखक आणि नाटककार श्री. पद्माकर डावरे, श्रीमती मथुराबाई द्रविड, नाटककार वि. रा. हंबर्डे, इतिहास संशोधक प्राचार्य ह. ना. सिन्हा, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार, पुण्यामुंबईकडील प्रसिद्ध विद्वान श्री. वा. दा. गोखले, प्रा. कृ. पां. कुळकर्णी, श्री. चिं. वि. जोशी, श्री. य. गो. जोशी, श्री. शं. ना.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जोशी. श्री. शेजवलकर या व्यक्तींच्या दुःखद निधनाबद्दल सर्व साधारण सभेने श्रद्धांजलि वाहिली.

सकाळी कार्यकारी मंडळाच्या सभेत कै. दादासाहेब धनवटे यांच्या निधनाबद्दल दुखवटयाचा ठराव करून श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली. शवयात्रा वि. सा. संघाजवळ आली त्यावेळी वि. सा. संघाचे विश्वस्त न्या. मू. श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांनी दादासाहेबांच्या पार्थिव देहाला पुष्पहार घातला. यावेळी वि. सा. संघाचे सदस्य आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## पुस्तक प्रकाशन समारंभ—

श्री. र. द. सरंजामे ॲडव्होकेट नागपूर यांनी लिहिलेल्या 'स्मृतिवैचित्र्य' ह्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ दि. २ ऑगस्ट ६४ रोजी सकाळी ८–३० वा. संघाध्यक्ष श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांच्या हस्ते पार पडला. यावेळी लो. ना. डॉ. बापूजी अणे आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणें झाली.

## निरोप समारंभ

वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष व ख्यातनाम साहित्यिक प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांची अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात बदली झाल्यामुळे दि. २ ऑगस्ट ६४ रोजी सायं. ६–३० वा. संघातर्फे निरोपसमारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी लो. ना. डॉ. बापूजी अणे अध्यक्षस्थानी होते. श्री. आ. रा. देशपांडे, श्री. ना. रा. शेंडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. श्री. ना. बनहट्टी, डॉ. शं. दा. पेंडसे, श्रीमान् पु. बा. काळेसाहेब, डॉ. य. खु. देशपांडे, पं. हृषीकेशजी शर्मा, प्रा. श्री. गो. काशीकर यांची भाषणें झाली. उत्तरादाखल प्राचार्य डॉ. वि. भि. कोलते यांनी भाषण दिले. आभारप्रदर्शनानंतर हा कार्यक्रम संपला.

## भेट—

प्रसिद्ध विद्वान् डॉ. ह. रा. दिवेकर (उज्जैन) यांनी दि. ११–८–६४ रोजी वि. सा. संघाला भेट दिली. यावेळी सरचिटणीस प्रा. श्री. गो. काशीकर यांनी डॉ. ह. रा. दिवेकर यांना वि. सा. संघाची वस्तू दाखविली व कार्याची माहिती दिली. संघाचे कार्य पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी पुढीलप्रमाणे उद्गार काढले "आज मंगळवार दि. ११–८–६४ रोजी विदर्भ साहित्य संघाचे दर्शन करण्याचा सुयोग आला. संघाचे केवढे तरी मोठे कार्य पाहून ठिकठिकाणी असे संघ निघाले तर मराठीची साहित्य व कलाविषयक दुर्दशा दूर होण्यास विलंब लागणार नाही अशी खात्री पटली. मराठीचा एक



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नम्र सेवक व मध्यप्रदेश मराठी साहित्य संघाचा एक कार्यकर्ता या दृष्टीने विदर्भ साहित्य संघाचे मी मनः पूर्वक अभिनंदन करतो व संघाची उत्तरोत्तर वृद्धि होवो अशी ईश्वराची प्रार्थना करतो."

### कै. नाना जोग स्मारक समीती

वि. सा. संघाच्या दि. २६ जुलै ६४ च्या वार्षिक साधारण सभेत कै. नाना जोग स्मारक समिती स्थापन करण्यात आली. त्यावेळी कै. नाना जोगांच्या पुतळ्यावर छत उभारण्यासाठी पुढील व्यक्तींनी देणग्या जाहीर केल्या.

श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) १०१ रु.

श्री. विनय दातार, कार्यवाह, रंजन कला मंदिर, नागपूर १०१ रु.

श्री. ना. कृ. शनवारे, कार्यवाह, नागपूर नाट्यमंडळ, नागपूर १०१ रु.

श्री. उद्धव वडस्कर विकास शिक्षण संस्था (सांस्कृतिक विभाग) ११ रु.

ह्या देणगीदारांचा वि. सा. संघ अत्यंत आभारी आहे.

### वि. सा. संघाचे सभासद

श्री. र. द. सरंजामे अॅडव्होकेट नागपूर हे रु. ५०० देऊन सहाय्यक सभासद झाले.

श्री दिनकर शंकर गोडबोले नागपूर हे रु. १०१ देऊन आजीव सभासद झाले.

श्री. ना. ल. अभ्यंकर नागपूर हे रु. १०० देऊन आजीव सभासद झाले.

वरील सभासदांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

## संलग्न संस्थावृत्त

### भारतीय भाषाध्ययनमंदिर, नागपूर

(१) दि. २६ जुलै ६४ रोजी भारतीय भाषाव्ययन मंदिराचा वर्षा-प्रमाणपत्र वितरण समारोह मा. प्रा. पां. कृ. सावळापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली मा. श्री. श्री. भि. वेलणकर, पी. अेम्. जी. नागपूर यांच्या हस्ते साजरा झाला. या समारोहात ३०० विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्रें घेतली.

(२) भारतीय भाषाध्ययन मंदिराच्या कार्याध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली दि. २७ जुलै ६४ रोजी मंदिराचे अधिकारी, अध्यापक व विद्यार्थी यांची सभा होऊन नागपुरातील उदारचरित थोर दाते व कर्तबगार उद्योगपति कै. श्रीमंत दादासाहेब धनवटे यांच्या शोचनीय निधनाबद्दल तीव्र दुःख प्रकट करण्यात येऊन शोकप्रस्ताव मंजूर करण्यात आला.

---

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# विदर्भ साहित्य संघाची प्रकाशने

| पुस्तके | | रु. पैसे |
|---|---|---|
| *१ निबंध परिमल | | २–२५ |
| †२ सुमन संचय | | १–२५ |
| †३ मराठी गद्य | ... | १–५० |
| †४ अंमलदार (नाटक) पु. ल. देशपांडे | | २–७० |
| ५ भारती (नाटक) नाना जोग | | १–५० |
| ६ हिंदी मराठी भाषा प्रवेशिका–मालतीबाई श्रीखंडे | | १–२५ |
| ७ कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह भाग २ | | ३–०० |
| ८ The Vedasthana or The Ancient Home of the Indo-A:yans- (पूर्ण ग्रंथ) | ले. कै. डॉ तु. ज. केदार | ३–०० |
| ✤ ९ आनंदगीत भाग ४ था | –कवि श्री. आनंदराव टेकाडे | ८–०० |
| ✻ १० प्रयोगक्षम मराठी नाटके (सूचि ग्रंथ) | –डॉ. मु. श्री. कानडे | १५–०० |
| ११ पयोष्णी (कविता सग्रह) | –कवि श्री. ज्ञा. रा. सावु | १–२५ |
| १२ मराठी वर्णोच्चार विकास | –डॉ. द. ह. अग्निहोत्री | १६–०० |

**✻ कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध**

| | | |
|---|---|---|
| १३ वाग्वैजयंतीचे पुनर्मूल्यन | –डॉ. मा. गो. देशमुख | ०–३१ |
| १४ नाटककार गडकरी | श्री –द. रा. गोमकाळे | ०–३१ |
| १५ गोविंदाग्रज याचा कवि या नात्याने विचार | –कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे | ०–५० |
| १६ गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत | –प्रा. श्री. मा. कुळकर्णी | ०–५० |
| १७ सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल | श्री.–द. वि. तेंडूलकर | ०–५० |
| १८ गडकऱ्यांची खरी भूमिका | –प्रा. भ. श्री. पंडित | ०–५० |
| १९ गडकऱ्यांची नाट्यशैली | –प्रा. रू. पां. पांजणकर | ०–५० |
| २० गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टि | –वसंत वरखेडकर | ०–६० |

**मासिके**

| | | |
|---|---|---|
| २१ युगवाणी मासिक (वि. सा. संघाचे मुखपत्र) | वार्षिक वर्गणी | ५–०० |
| २२ युगवाणी नाट्यसंमेलन विशेषांक, | डिसेंबर १९५८ | ३–०० |
| २३ युगवाणी ४४ वे मराठी नाट्यसंमेलन विशेषांक, | एप्रिल १९६२ | १–०० |

* ह्या पुस्तकाचे विक्रीचे अधिकार सुविचार प्रकाशन, नागपूर याचेकडे आहेत.

† ह्या पुस्तकांच्या विक्रीचे अधिकार ठाकूर आणि कंपनी, नागपूर यांचेकडे आहेत.

✤ ह्या पुस्तकांच्या विक्रीचे अधिकार जयश्री प्रकाशन, धरमपेठ विस्तार, यांचेकडे आहेत.

✻ ह्या पुस्तकाच्या विक्रीचे अधिकार व्हीनस प्रकाशन पुणे यांचेकडे आहेत.

बाकीची सर्व पुस्तके वि. सा संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १ या पत्त्यावर मिळतील.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

# विदर्भ साहित्य संघ, नागपूर

## नवीन सभासद होऊ इच्छिणारांस व प्रचारकांस सूचना

ज्यानां विदर्भ साहित्य संघाचे नवीन सभासद व्हावयाचे आहे त्यांच्या मार्गदर्शनासाठी पुढील सूचना देत आहोत.

१. सभासद होऊ इच्छिणाराने ठराविक अर्ज (आवेदनपत्र) भरून देणे आवश्यक आहे.

२. अर्जासोबत सभासदत्वाची वर्गणी पाठवावी. साधारण सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ३ आहे. मात्र वर्गणी दिल्याची छापील पावती अवश्य घ्यावी. सर्व अधिकृत प्रचारकांजवळ पावतीपुस्तके दिलेली आहेत.

३. केवळ सभासदत्वाचा अर्ज भरून सभासदत्व मिळणार नाही. तेव्हा वर्गणी भरल्याची पावती सभासदांनी जपून ठेवावी.

४. सभासदांना युगवाणी मासिकाचा अंक विनामूल्य पाठविण्यात येतो. ज्या महिन्यात वर्गणी भरली असेल त्याच्या पुढच्या महिन्यापासून युगवाणी अंक पाठविण्यात येतो.

५. अंक न मिळाल्यास सरचिटणीसांकडे चौकशी करावी. सोबत पावती-क्रमांक व प्रचारकाचे नाव कळवावे.

६. जुन्या सभासदांकडे मागील वर्गणी थकित असल्यास त्यांना मतदानाचा अधिकार राहणार नाही. ज्यांच्याकडे वर्गणी थकित राहून एक वर्ष किंवा अधिक काळ झाला असेल त्यांचे सभासदत्व रद्द करण्याचा कार्यकारी मंडळास अधिकार आहे.

वरील सूचनांचे पालन न झाल्यामुळे जर कोणाला सभासदत्व मिळू शकले नाही किंवा युगवाणीचा अंक मिळाला नाही किंवा आगामी निवडणुकीत मतदान करता आले नाही तर विदर्भ साहित्य संघावर त्याची कोणत्याही प्रकारे जबाबदारी राहणार नाही. वि. सा. संघाच्या कार्यकर्त्यांनीही ह्या सूचनांची दखल घ्यावी ही विनंती आहे.

नागपूर
दि. १३-८-६४

(प्रा.) श्री. गो. काशीकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता
नागपूर

हे मासिक एम्. जी. सराफ यांनी नागपूर टाइम्स प्रेस, रामदासपेठ, नागपूर-१ येथे मुद्रित करून प्रा. श्री. मा. कुलकर्णी यांनी वि. सा. संघाकरिता, संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ